# अभंग - ज्ञानेश्वरी
## अध्याय अकरावा

आतां अवधारा । कथा [1] एकादशीं । आहे दोहीं * रसीं । परिपूर्ण ।।१।।
जेथें विश्वरूप-। दर्शनाचा योग । घडेल हो चांग । पार्थालागीं ।।२।।
* शांतरसाचिया । घरीं जेथ भला । पाहुणा पातला । * अद्‌भुत तो ।।३।।
बैसले पंक्तीस । रस जे इतर । जाहला सत्कार । तयांचा हि ।।४।।
वधू-वरांचिया । मिरवती लग्नीं । वस्त्रीं [2] आभरणीं । वऱ्हाडी हि ।।५।।
तैसे मराठीच्या । सुखासनीं भले । देखा मिरवले । सर्व रस ।।६।।
परी शान्ताद्भुत । बहु शोभिवंत । घ्यावे ओंजळींत । लोचनांच्या ।।७।।
भासती ते जैसे । भेटाया साचार । आले हरि-हर । प्रेमभावें ।।८।।
किंवा चंद्र-सूर्य । अमावास्या-दिनीं । भेटती गगनीं । एकमेकां ।।९।।
तैसें शांत आणि । अद्‌भुत हे रस । प्रेमें भेटायास । आले येथें ।।१०।।
गंगा-यमुनौघ । मिळोनि एकत्र । प्रयाग सु-क्षेत्र । झालें जैसें ।।११।।
मिळाले तैसे च । येथें शांताद्भुत । म्हणोनि [3] सुस्नात । होत विश्व ।।१२।।
गंगे-यमुनेचे । प्रवाह प्रकट । तैसे मूर्तिमंत । दोन्ही रस ।।१३।।
माजीं गीतारूप । सरस्वती गुप्त । म्हणोनि उचित । त्रिवेणी ही ।।१४।।
कराया प्रवेश । ऐशा त्रिवेणींत । सुलभ हा पंथ । श्रवणाचा ।।१५।।
ज्ञानदेव म्हणे । सद्‌गुरूची कृपा । मार्ग झाला सोपा । सर्वांलागीं ।।१६।।
धर्माचें निधान । श्रीगुरु निवृत्ति । तेणें मज हातीं । धरोनियां ।।१७।।

---

* परिशिष्ट पहा. १ अकराव्या अध्यायांत. २ दागिन्यांनी. ३ उत्तम स्नान केलेले.

तोडोनि बिकट । संस्कृताचे तट । बांधिला हा घाट । मराठीचा ।।१८।।
म्हणोनि कोणी हि । गीता-त्रिवेणींत । सद्‌भावें सु-स्नात । व्हावें आतां ।।१९।।
मग विश्वरूप–। माधवासन्मुख । [1] द्यावें [1] तिळोदक । संसारासी ! ।।२०।।
असो, मूर्तिमंत । ऐसे रसभाव । देखा येथें सर्व । भरा आले ।।२१।।
श्रवणसुखाचें । येथें आज भलें । राज्य प्राप्त झालें । जगालागीं ।।२२।।
जेथें शांताद्‌भुत । होती मूर्तिमंत । आणि [2] प्रतिष्ठित । इतर हि ।।२३।।
असो हें तों गौण । परी जेथें पूर्ण । [3] कैवल्य-निधान । प्रकटलें ।।२४।।
तो हा अकरावा । अध्याय पावन । विश्रांतीचें स्थान । विश्वेशाचें ।।२५।।
परी तो अर्जुन । पातला येथें हि । काय त्याचें नाहीं । थोर भाग्य ? ।।२६।।
काय म्हणूं येथें । पार्थ चि पातला । सुकाळ हा झाला । कोणातें हि ।।२७।।
कीं तो मूर्तिमंत । गीतेचा भावार्थ । देखा मराठींत । प्रकटला ।।२८।।
ह्या चि लागीं लक्ष । द्यावें तुम्हीं संतीं । ऐकावी विनंति । ही च माझी ।।२९।।
लडिवाळपण । ऐसें करावया । तुम्हां संतांचिया । सभेमाजीं ।।३०।।
असोनि अपात्र । जरी आजि [4] धजें । तरी तुम्ही माझे । मायबाप ।।३१।।
मज लेकरातें । आपुला मानून । घ्यावें सांभाळून । प्रेमभावें ।।३२।।
अहो पढवावें । राघूसी आपण । पढे तरी मान । डोलवावी ।।३३।।
ना तरी माउली । बाळकालागोन । प्रेमें शिकवोन । नाना गोष्टी ।।३४।।
मग तयाचिया । कृतीचें कौतुक । करोनियां सुख । पावे जैसी ।।३५।।
तैसें तुम्हांपुढें । जें जें बोलें येथें । तुम्ही च तें मातें । शिकविलें ।।३६।।
म्हणोनियां प्रभो । आपुलें आपण । करावें श्रवण । तुम्हीं संतीं ।।३७।।
अहो संत-जन । तुम्हीं च हें गोड । लाविलें ना झाड । साहित्याचें ? ।।३८।।
अवधानरूपी । अमृत शिंपून । करावें पोषण । तरी आतां ।।३९।।
रसभावरूप । फुलांचा सुंदर । येईल बहर । मग ह्यासी ।।४०।।
आणि नानार्थांच्या । फळभारें पूर्ण । देखा ओथंबून । येईल हें ।।४१।।
तुमचिया धर्में । सहजें होईल । सुखाचा सुकाळ । जगालागीं ।।४२।।

---

१ संबंध सोडावा. २ मान दिलेले; सन्मानित. ३ मोक्षाचा ठेवा. ४ धीटपणा करतों.

ऐकोनि हे बोल । संत आनंदले । म्हणती गा भलें । केलें तुवां ॥४३॥
संतोषलों आम्ही । आतां सांगें तेथें । पुसिलें जें पार्थें । कृष्णालागीं ॥४४॥
तंव ज्ञानदेव । निवृत्तीचा दास । म्हणे श्रोतयांस । विनवोनि ॥४५॥
अहो कृष्णार्जुन–। संवाद अद्‌भुत । मी तरी [१] प्राकृत । काय बोलूं ॥४६॥
परी बोलवाल । जरी तुम्ही मज । तरी तो सहज । बोलेन मी ॥४७॥
प्रभु रामचंद्रें । वानरांकडोन । लंकेचा रावण । जिंकविला ॥४८॥
केल्या पराभूत । अकरा * अक्षौहिणी । धनंजयें रणीं । एकल्यानें ॥४९॥
म्हणोनि समर्थ । जें जें करी कांहीं । चराचरीं होई । तें तें सिद्ध ॥५०॥
तैसे तुम्ही श्रोते । सज्जन समर्थ । बोलवा गीतार्थ । माझ्या मुखें ॥५१॥
असो ऐका आतां । गीताभाव स्पष्ट । बोलिला वैकुंठ–। नायक जो ॥५२॥
* अनादि जो * आद्य । [२] वेदप्रतिपाद्य । जो का विश्ववंद्य । परमात्मा ॥५३॥
तो चि कृष्णनाथ । जिये ग्रंथीं वक्ता । धन्य तो श्रीगीता–। ग्रंथ धन्य ॥५४॥
तेथींची थोरवी । [३] वानूं कैसी किती । शंभूची हि मति । गुंग जेथें ॥५५॥
आतां जीवेंभावें । तया नमस्कार । करावा साचार । हें चि भलें ॥५६॥
असो विश्वरूप । देखावयासाठीं । ऐका तो किरीटी । काय करी ॥५७॥
[४] निजांतरीं तेणें । भोगिला प्रत्यय । सर्वेश्वरमय । विश्व सर्व ॥५८॥
तरी आतां व्हावा । तो चि सर्वेश्वर । बाहेरी [५] गोचर । लोचनांसी ॥५९॥
ऐसी उत्कटेच्छा । अंतरामाझारीं । धजे ना तो परी । बोलावया ॥६०॥
मनीं म्हणे जें का । विश्वरूप गूढ । कैसें तें उघड । पुसों आतां ॥६१॥
पूर्वी कधीं कोणी । प्रिय व्यक्तीनें हि । विचारिलें नाहीं । देवासी जें ॥६२॥
तें चि विश्वरूप । दाखवावें मज । म्हणूं कैसें आज । एकाएकीं ॥६३॥
माते लक्ष्मीहून । काय जवळचा । असें मी देवाचा । सखा जरी ॥६४॥
परी तिजसी हि । नाहीं झालें धैर्य । काढाया विषय । देवाशीं हा ॥६५॥
गरुडासमान । नाहीं केली सेवा । परी तो हि देवा–। जवळी हें ॥६६॥
बोलावया जेथें । करी च ना धीर । तेथें मी साचार । पुसों कैसें ? ॥६७॥

---

१ सामान्य मनुष्य. २ वेदांनीं वर्णावा असा. ३ वर्णूं. ४ स्वत:च्या अंत:करणांत. ५ दिसावयाजोगा.

नित्य [१] संनिधानीं । * सनकादि मुनि । काय तयांहूनि । निकट मी ।।६८।।
तयांसी हि नाहीं । सुचला हा चाळा । काय मी आगळा । तयांहून ।।६९।।
अहो गोकुळींच्या । [२] प्रेमळांसमान । काय आवडेन । देवासी मी ।।७०।।
परी बाळरूपें । तेणें यशोदेसी । गोपगोपिकांसी । ठकविलें ।।७१।।
एकादशी-व्रत । * अंबरीषें केलें । तयाचे सोशिले । गर्भवास ।।७२।।
परी विश्वरूप । राखोनि ठेविलें । नाहीं दाखविलें । कोणातें हि ।।७३।।
एवढें हें गुज । एकाएकीं आतां । कैसें भगवंता–। लागीं पुसों ।।७४।।
आणि पुसों नये । ऐसें जरी म्हणें । तरी मज तेणें । सुख नोहे ।।७५।।
आतां देहीं प्राण । राहणें कठिण । देखिल्यावांचोन । विश्वरूप ।।७६।।
तरी हळुहळू । करावें प्रकट । निज-मनोगत । देवापाशीं ।।७७।।
मग तयालागीं । आवडेल जैसें । [३] रहाटावें तैसें । आपण हि ।।७८।।
योजूनियां ऐसें । पार्थ भीत भीत । जाहला प्रवृत्त । बोलावया ।।७९।।
परी बोलांमाजीं । होता जो का भाव । तयाचा प्रभाव । काय सांगूं ।।८०।।
कीं जो मुखें बोल । निघतां चि देवें । प्रकट करावें । विश्वरूप ।।८१।।
अहो धेनु जैसी । निज वत्स पाहे । आणि उठे [४] मोहें । खडबडोनि ।।८२।।
मग तयें तिज । मारितां चि ढुसी । सोडील ना कैसी । पान्हा तेथें ? ।।८३।।
तैसा पांडवांचा । कराया सांभाळ । धांवे जो गोपाळ । रानीं-वनीं ।।८४।।
तया कळतां चि । पार्थाचें हें [५] आर्त । कैसें बरें स्वस्थ । रहावेल ? ।।८५।।
कृष्ण परमात्मा । देव रमा-पति । असे प्रेम-मूर्ति । स्वभावें तो ।।८६।।
तया प्रेमा मग । मिळे उत्तेजन । भेटतां अर्जुन । प्राणसखा ।।८७।।
आतां एकमेक । भोगितां तें सुख । उरे वेगळीक । हें चि बहु ।।८८।।
म्हणोनियां पार्थें । प्रार्थितां चि देव । दाखवील विश्व–। रूप कैसें ।।८९।।
तो चि आरंभींचा । ऐका कथाभाग । देवोनियां [६] चांग । अवधान ।।९०।।

अर्जुन उवाच–

मदनुग्रहाय परमं गुह्यमध्यात्मसंज्ञितम् ।

---

१ जवळच. २ प्रेमळ गोपगोपींसारखा. ३ वागावें. ४ मायेनें. ५ उत्कट इच्छा. ६ चांगलें.

यत्त्वयोक्तं वचस्तेन मोहोऽयं विगतो मम ॥१॥

[१] तंव पार्थ म्हणे । तुम्हीं मजसाठीं । प्रकटिल्या गोष्टी । [२] शब्दातीत ॥९१॥
जीव– * महदादि । जेव्हां [३] लुप्त होती । * अव्यक्तीं आटती । महा-भूतें ॥९२॥
तेव्हां स्वरूपीं ज्या । राहसी तूं देव । विश्रांतीचा ठाव । [४] अंतिम तो ॥९३॥
ठेविलें जें होतें । कृपणाच्या परी । तुवां निजांतरीं । राखोनियां ॥९४॥
तेविं शब्दब्रह्मा–। पासोनि हि तुवां । लपवोनि देवा । ठेविलें जें ॥९५॥
तें चि जीवाचिया । अंतरींचें गुज । प्रकटिलें आज । मजपुढें ॥९६॥
जया आत्मज्ञाना–। साठीं नीलकंठें । ऐश्वर्य गोमटें । [५] ओंवाळिलें ॥९७॥
तीच वस्तु तुवां । मजलागीं भली । दाखवोनि दिली । एकाएकीं ! ॥९८॥
ऐसें बोलूं तरी । आम्ही तुजहून । असूं काय भिन्न । अंतर्यामीं ? ॥९९॥
परी गेलों होतों । साच बुडोनियां । माया-मोहाचिया । महा-पूरीं ॥१००॥
घालोनियां उडी । तों चि तूं श्रीहरि । काढिलें बाहेरी । आतां मज ॥१०१॥
एक तुजविण । आणिक तों कांहीं । विश्वीं दुजें नाहीं । हें चि साच ॥१०२॥
परी विपरीत । आमुचें * संचित । कैसे झालों भ्रांत । अहंकारें ॥१०३॥
पाहें जगामाजीं । मी एक अर्जुन । देह-अभिमान । वाहें ऐसा ॥१०४॥
तेविं कौरवांतें । मानोनि स्व-जन । नको म्हणें रण । ह्यांच्यासवें ॥१०५॥
हे तों आप्त-जन । वधोनियां ह्यांतें । थोर दुर्गतीतें । पावेन मी ॥१०६॥
ऐसें दुष्ट स्वप्न । होतों मी पहात । तों चि तूं जागृत । केलें मज ॥१०७॥
सोडोनि * गंधर्व–। नगरीची वस्ती । बाहेरी श्रीपति । निघालों मी ॥१०८॥
करीत मी होतों । * मृग-जळ-पान । भागावी तहान । म्हणोनियां ॥१०९॥
सर्प नव्हे दोरी । परी त्या * लहरी । मज खरोखरी । येत होत्या ॥११०॥
ऐशापरी होतों । मरत मी वायां । वांचविलें दया–। सिंधो तुवां ॥१११॥
[६] कूपीं प्रतिबिंब । आपुलें च पाहे । उडी घालिताहे । सिंह तेथें ॥११२॥
तों चि तया कोणी । धरोनि राखावें । तैसें मज देवें । वांचविलें ॥११३॥
एऱ्हवीं अनंता । मी तरी साचार । ऐसा चि निर्धार । केला होता ॥११४॥

---

१ तेव्हां. २ बोलाच्या पलीकडील. ३ नाहींशीं होतात. ४ अखेरचा. ५ टाकून दिलें. ६ विहिरींत.

सप्त हि सागर । एके ठायीं यावे । आघवें बुडावें । जग चि हें ॥११५॥
वरी आकाश हि । पडावें तुटोन । परी नको रण । [१]गोत्रजांशीं ॥११६॥
ऐशा अहंकारें । [२]खेंचला जावोन । आग्रहीं बुडोन । गेलों होतों ॥११७॥
माझिया सन्निध । भला तूं श्रीहरि । म्हणोनि बाहेरी । काढिलेंस ॥११८॥
[३]लटिका मी एक । लटिके गोत्रज । लटिकें च झुंज । असोनि हि ॥११९॥
मानोनि तें साच । झालों होतों [४]पिसा । परी तूं विश्वेशा । राखिलेंस ॥१२०॥
*लाक्षागृहीं आम्हां । संरक्षिलें साच । तें तों देहासीच । होतें भय ॥१२१॥
परी आतां येथें । चैतन्यासकट । होत होता घात । सर्वस्वाचा ॥१२२॥
दुराग्रहरूपी । दैत्य *हिरण्याक्ष । घेवोनियां पक्ष । असत्याचा ॥१२३॥
मारोनि खांकेस । बुद्धि-वसुंधरा । मोहार्णव-द्वारा । लपे आंत ॥१२४॥
आपुल्या सामर्थ्यें । पुन्हा एक वेळ । माझी बुद्धि मूळ । जागीं आली ॥१२५॥
माझ्यासाठीं दुजा । *वराहावतार । लागला साचार । घ्यावा तुज ! ॥१२६॥
ऐसे हे अपार । तुझे उपकार । एका मुखें फार । काय बोलूं ॥१२७॥
परी प्रेम-सिंधो । निज-पंच-प्राण । माझिया स्वाधीन । केले तुवां ॥१२८॥
नि:सीम तें प्रेम । वायां नाहीं गेलें । भलें यशा आलें । देवराया ॥१२९॥
तुझ्या प्रसादें चि । प्रभो नि:संदेह । नष्ट झाला मोह । सर्व माझा ॥१३०॥
दिव्य आनंदाच्या । सरोवरांतील । जणूं सु-निर्मळ । [५]पुण्डरीक ॥१३१॥
सतेज कोमल । ऐसी तुझी दृष्टि । करी कृपावृष्टि । जयावरी ॥१३२॥
तयापुढें माया–। मोहाचा प्रभाव । तुच्छ सर्वथैव । नव्हे कैसा ? ॥१३३॥
*वडवाग्निपुढें । मृग-जळ-वृष्टि । तैसी भव-भ्रांति । तुजपुढें ॥१३४॥
तुझ्या कृपेचिया । रिघोनि [६]गाभारां । घेतसें मी चारा । स्वानंदाचा ॥१३५॥
आतां मायामोह । पावला विलय । आश्चर्य तें काय । देवा येथें ? ॥१३६॥
घेवोनि शपथ । तुझ्या पायांची च । सांगतों मी साच । उद्धरलों ॥१३७॥

भवाप्ययौ हि भूतानां श्रुतौ विस्तरशो मया ।
त्वत्त: कमलपत्राक्ष माहात्म्यमपि चाव्ययम् ॥२॥

---

*परिशिष्ट पहा. १ आपल्याच कुळांतील मंडळीशीं. २ ओढला. ३ मायिक. ४ वेडा. ५ कमळ. ६ गाभाऱ्यांत.

तुझे देवदेवा । [1] विस्तीर्ण नयन । कमळासमान । विराजती ॥१३८॥
कोटीसूर्यांसम । दिव्य तुझें तेज । आज तूं चि मज । बोध केला ॥१३९॥
होते कैशा रीती । भूतांची उत्पत्ति । कैशीं लया जाती । मागुती तीं ॥१४०॥
तें चि प्रकृतीचें । तुवां परिपूर्ण । केलें विवेचन । मजपुढें ॥१४१॥
* 'पुरुष' तत्त्वाचा । दाविला [2] निवाडा । देवोनियां झाडा । प्रकृतीचा ॥१४२॥
त्या चि पुरुषाचें । पांघरोनि यश । [3] जाहलें [3] सुवेष । शब्दब्रह्म ॥१४३॥
मग धर्माऐसें । प्रसवलें रत्न । लाहोनि जीवन । उत्कर्षें त्या ॥१४४॥
त्या चि पुरुषाचा । घेतला आश्रय । म्हणोनियां श्रेय । लाभलें हें ॥१४५॥
असो ऐसें तुझें । अगाध माहात्म्य । स्वानुभवरम्य । असें जें कां ॥१४६॥
सकल हि मार्गीं । जाणावया होय । एक चि विषय । सर्वथा जें ॥१४७॥
तें चि तुवां मज । जगत्पते आज । दाविलें सहज । ऐशा रीती ॥१४८॥
मेघाचें पटल । नष्ट होतां जैसें । भानु-बिंब दिसे । नभामाजीं ॥१४९॥
किंवा हातें दूर । सारितां शेवाळ । सुनिर्मळ जळ । दिसूं लागे ॥१५०॥
नातरी सर्पाचे । दूर होतां वेढे । जैसी भेट घडे । चंदनाची ॥१५१॥
किंवा हस्तगत । होय द्रव्य-राशि । पळोनि [4] विवशी । जाय जेव्हां ॥१५२॥
तैसी ज्ञानाआड । प्रकृति जी होती । देवें सारोनि ती । पलीकडे ॥१५३॥
मग बुद्धीलागीं । माझिया साचार । केलें [5] शेजघर । परब्रह्म ॥१५४॥
म्हणोनियां एक । तूं चि सर्वेश्वर । जाहला निर्धार । जीवाचा हा ॥१५५॥
परी उत्कटेच्छा । आणिक हि एक । उपजली देख । कृपासिंधो ॥१५६॥
धरोनियां भीड । उगा चि रहावें । तरी पुसों जावें । दुज्या कोणा ? ॥१५७॥
जाणतसों काय । आम्ही ठाव दुजा । देवा अधोक्षजा । तुजवीण ? ॥१५८॥
होतो उपकार । जळाचा म्हणोनि । जळचरें पाणी । सांडियेलें ॥१५९॥
किंवा तान्ह्या बाळें । मानिला संकोच । करावया साच । स्तनपान ॥१६०॥
तरी निजप्राण । रक्षावया जाण । असे का साधन । दुजें त्यासी ? ॥१६१॥
म्हणोनियां आतां । न धरितां भीड । बोलावें उघड । आवडे तें ॥१६२॥

---

*परिशिष्ट पहा.　१ विशाल.　२ निर्णय.　३ नटले; सजलें.　४ पिशाच्च.
५ विश्रांतीची (झोपण्याची) जागा.

ऐसें माझ्या मनीं । आलें चक्र-पाणी । तंव बोल झणिं । म्हणे देव ॥१६३॥

एवमेतद्यथाऽऽत्थ त्वमात्मानं परमेश्वर ।
द्रष्टुमिच्छामि ते रूपमैश्वरं पुरुषोत्तम ॥३॥

मग म्हणे पार्थ । विभूति आपुल्या । मज दावियेल्या । तुम्हीं देवा ॥१६४॥
शांत झाली माझ्या । प्रतीतीची दृष्टि । पाहोनि विभूति–। विस्तार तो ॥१६५॥
लोक-मालिका ही । होवोनि हारपे । जयाच्या संकल्पें । हृषीकेशा ॥१६६॥
आणि जया ठाया । देवा तूं आपण । साच मी म्हणोन । संबोधिसी ॥१६७॥
तें तुझें केवळ । स्वरूप जें मूळ । जेथोनि सकळ । घेसी रूपें ॥१६८॥
होसी तूं [१] द्विभुज । तेविं चतुर्भुज । करावया काज । [२] निर्जरांचें ॥१६९॥
क्षीर-सागरांत । शेषशायी होसी । अवतार घेसी * मत्स्यादिक ॥१७०॥
गारुडी तूं ऐसा । संपतां चि खेळ । राहसी केवळ । स्वरूपीं ज्या ॥१७१॥
अंतरीं रिघोनि । ध्याती [३] योगी-वृंदें । सर्वोपनिषदें । गाती जया ॥१७२॥
जया स्वरूपातें । सनकादि मुनि । राहिले देवोनि । प्रेम-मिठी ॥१७३॥
ऐसें विश्वरूप । ऐकतों जें कानीं । अगाध म्हणोनि । तुझें देवा ॥१७४॥
तें चि देखावया । झालें जगन्नाथा । माझें चित्त आतां । उतावीळ ॥१७५॥
तुम्ही माझा दूर । करोनि संकोच । मज लोभें साच । विचारिलें ॥१७६॥
तरी ही च एक । तीव्र इच्छा मनीं । असें बाळगोनि । राहिलों मी ॥१७७॥
कीं तें तुझें एक । विश्वरूप थोर । दृष्टीसी [४] गोचर । [४] व्हावें माझ्या ॥१७८॥

मन्यसे यदि तच्छक्यं मया द्रष्टुमिति प्रभो ।
योगेश्वर ततो मे त्वं दर्शयात्मानमव्ययम् ॥४॥

परी आणिक तें । ऐक मायबापा । तुज विश्वरूपा । देखावया ॥१७९॥
असे माझ्या ठायीं । योग्यता साचार । किंवा अधिकार । नसे माझा ॥१८०॥
आपुलें आपण । कांहीं च हें नेणें । नेणसी कां म्हणे । देव जरी ॥१८१॥
तरी रोगी काय । आपुलें आपण । रोगाचें [५] निदान । जाणतसे ? ॥१८२॥
आणि होतां मन । तीव्र इच्छाधीन । पडे विस्मरण । पात्रतेचें ॥१८३॥

---

*परिशिष्ट पहा.　१ दोन हात असलेला.　२ देवांचें.　३ योग्यांचे समुदाय.　४ उघड दिसावें.　५ परीक्षा.

जैसें म्हणे कोणी । [1] तृषाक्रांत नर । न पुरे सागर । मज आतां ।।१८४।।
ऐसी अनावर । उत्कंठेची भूल । राखवेना तोल । माझा मज ।।१८५।।
म्हणोनियां जाणे । माउली च साची । जैसी बालकाची । योग्यता ती ।।१८६।।
तैसा विचारांत । घेवोनि साचार । माझा अधिकार । जनार्दना ।।१८७।।
मग प्रवर्तावें । देवा यदुराया । मज दाखवाया । विश्वरूप ।।१८८।।
नसे माझ्या अंगीं । पात्रता ती चांग । तरी तैसें सांग । कृपावंता ।।१८९।।
वायां चि सुस्वर । गावोनियां गाणें । तेणें सुख देणें । बधिरासी ! ।।१९०।।
चातकासाठीं च । जरी [2] वर्षे मेघ । तृप्त करी जग । आघवें तो ।।१९१।।
परी मेघ-वृष्टि । खडकीं जी होय । वृथा नव्हे काय । सर्वथा ती ? ।।१९२।।
चकोरासाठीं च । काय चंद्रामृत । नव्हे का तें प्राप्त । सर्वांसी हि ।।१९३।।
परी सर्वांसी तों । अमृताचे कण । वेंचायाचें ज्ञान । असे कोठें ? ।।१९४।।
पडला प्रकाश । उजाडोनि दिन । परी दृष्टीविण । काय होय ? ।।१९५।।
असो; विश्वरूप । दाविसील ऐसा । पूर्ण भरंवसा । असे मज ।।१९६।।
कीं तूं सर्वेश्वरा । जाणां-अजाणांसी । होसी सकळांसी । नित्य नवा ।।१९७।।
कैसें तुझें थोर । औदार्य स्वतंत्र । देतां पात्रापात्र । पाहसी ना ।।१९८।।
कैवल्याएवढी । वस्तु जी पावन । करिसी ती दान । वैऱ्यांसी हि ।।१९९।।
जगीं मोक्ष बहु । दुर्लभ तो होय । तो हि तुझे पाय । सेवीतसे ।।२००।।
म्हणोनियां जाय । पाठविसी तेथें । [3] पाइकाचें नातें । स्वीकारोनि ।।२०१।।
पाजोनियां तुज । विष-स्तन-पान । हरूं पाहे प्राण । * पूतना जी ।।२०२।।
तिज तुवां दिलें । सायुज्याचें दान । ऋषींच्या समान । सनकादि ।।२०३।।
राजसूय-यज्ञ । केला धर्मराजें । तेथें ऋषि राजे । पातले जे ।।२०४।।
तयांच्या समक्ष । दुर्वाक्यें बोलोन । जेणें अपमान । केला तुझा ।।२०५।।
ऐसा * शिशुपाल । दंडावयाजोगा । दिली तया जागा । स्व-स्वरूपीं ।।२०६।।
उत्तानपादाचा । पुत्र * ध्रुवबाळ । मिळवाया स्थळ । [4] पितृ-अंकीं ।।२०७।।
मधुवनामाजीं । घालोनि आसन । करी तुझें ध्यान । भक्ति-भावें ।।२०८।।

---

१ तहानेनें व्याकुळ झालेला.    २ पाऊस पडतो.    ३ सेवकाचें.    ४ बापाच्या मांडीवर.

तरी तयासी तूं । चंद्रसूर्याहून । भलें दिलें स्थान । विश्वामाजीं ॥२०९॥
दु:खितांसी ऐसें । कैवल्य उघडें । देतां मागें पुढें । पाहसी ना ॥२१०॥
अंतीं नारायण । नाम उच्चारून । करी पाचारण । पुत्रालागीं ॥२११॥
ऐसा * अजामीळ । संसारीं आसक्त । तरी हि तो मुक्त । केला तुवां ॥२१२॥
[१] वक्ष:स्थळीं लाथ । मारी * भृगुऋषि । परी मिरविसी । भूषण तें ॥२१३॥
दुष्ट * शंखासुर । जो कां तुझा वैरी । बाळगिसी करीं । देह त्याचा ॥२१४॥
अपकाऱ्यांसी हि । तुझा उपकार । होसी तूं उदार । अपात्रीं हि ॥२१५॥
घेवोनियां दान । त्रिपाद भूमीसी । * बळीचा झालासी । द्वार-पाळ ॥२१६॥
काय * गणिकेनें । केली तुझी भक्ति । काय गुण-कीर्ति । [२] परिसिली ॥२१७॥
होती बोलावीत । कौतुकें राघूसी । तरी वैकुंठासी । नेलें तिज ॥२१८॥
ऐसें अल्प-स्वल्प । पाहोनि निमित्त । करिसी तूं मुक्त । एकाएकीं ॥२१९॥
तो तूं कृपावंत । उदार दयाळ । काय [३] वाळिशील । मजलागीं ? ॥२२०॥
करोनि सुकाळ । दुग्धाचा अवीट । निवारी संकट । जगाचें जी ॥२२१॥
तिये [४] सुरभीचीं । वत्सें क्षुधाग्रस्त । ऐसें विपरीत । घडे केविं ? ॥२२२॥
म्हणोनि जें तुज । विनविलें कांहीं । तें तूं लवलाहीं । दाविशील ॥२२३॥
परी विश्वरूप । देखावया थोर । योग्यता साचार । देईं मज ॥२२४॥
देवा तुझ्या विश्व-। रूपाचें दर्शन । घ्यावया लोचन । समर्थ हे ॥२२५॥
ऐसें तुज वाटे । तरी मनोरथ । आतांचि त्वरित । पूर्ण करीं ॥२२६॥
ऐसी यथायोग्य । कराया विनंति । सरसावे पति । सुभद्रेचा ॥२२७॥
तंव तें * षड्गुण-। चक्रवर्तीलागीं । कैसें त्या प्रसंगीं । साहवेल ॥२२८॥
कृपामृतें पूर्ण । मेघ तो श्रीकृष्ण । सन्निध अर्जुन । वर्षाकाळ ॥२२९॥
ना तरी तो वाटे । कोकिळ श्रीकांत । पार्थ तो वसंत । जणूं तेथें ॥२३०॥
किंवा पाहोनियां । पौर्णिमेचा [५] विधु । जैसा क्षीरसिंधु । उचंबळे ॥२३१॥
तैसा [६] द्विगुणित । प्रेम-बळें कृष्ण । पार्थासी पाहोन । उल्हासला ॥२३२॥
तया उल्हासाच्या । मग आवेशांत । म्हणे कृपावंत । गर्जोनियां ॥२३३॥

---

*परिशिष्ट पहा. १ छातीवर. २ ऐकिली. ३ दूर टाकशील. ४ कामधेनूचीं. ५ चंद्र. ६ दुप्पट.

दाखवीन देख । आतां क्षणार्धांत । पार्था असंख्यात । [१]स्वस्वरूपें ।।२३४।।
एक विश्वरूप । देखावें ऐसा च । मनोरथ साच । अर्जुनाचा ।।२३५।।
विश्वरूपमय । परी देवें भलें । करोनि ठेविलें । आघवें चि ! ।।२३६।।
अहो देखा कैसें । देवाचें औदार्य । अपार तें काय । मापितां ये ? ।।२३७।।
सहस्र पटीनें । जो का सदोदित । पुरवितो आर्त । याचकांचे ।।२३८।।
भक्ताचिया भावा । भुलोनि तो देव । आपुलें सर्वस्व । अर्पीतसे ।।२३९।।
ठेविलें चोरोन । वेदांपासोनि हि । दाविलें जें नाहीं । शेषातें हि ।।२४०।।
रमेपासोनि हि । राखिलें निभ्रांत । जीवींचें गुपित । ऐसें जें का ।।२४१।।
तें चि विश्वरूप । नाना प्रकारांनीं । प्रकट करोनि । दावीतसे ।।२४२।।
दावी विश्वरूप । श्रीहरि साचार । भाग्य हें अपार । अर्जुनाचें ।।२४३।।
जागृतीमधून । स्वप्नामाजीं जातां । दिसे तें तें स्वतां । आपण चि ।।२४४।।
तैसा अगणित । ब्रह्मांडस्वरूप । झाला आपोआप । स्वयें चि तो ।।२४५।।
प्रकटिला विश्व–। रूपाचा आकार । केशवें साचार । एकाएकीं ।।२४६।।
फेडोनियां स्थूल–। दृष्टीचें [२]पटल । दाविलें केवल । योगैश्वर्य ।।२४७।।
परी नाहीं आलें । तयाचिया ध्यानीं । पार्थ कैसा झणीं । देखेल हें ।।२४८।।
झाला [३]प्रेमातुर । म्हणे एकाएकीं । पार्था हें विलोकीं । विश्वरूप ।।२४९।।

श्री भगवानुवाच–

पश्य मे पार्थ रूपाणि शतशोऽथ सहस्रशः ।
नानाविधानि दिव्यानि नानावर्णाकृतीनि च ।।५।।

तुज विश्वरूप । दाखविलें एक । कायसें कौतुक । तरी त्यांत ? ।।२५०।।
माझ्या चि स्वरूपीं । आघवें हें आतां । सामावलें पार्था । देख देख ।।२५१।।
कांहीं कृश कांहीं स्थूल । लघु आणिक विशाळ ।।२५२।।
कांहीं सरळ विस्तीर्ण । कांहीं देख [४]प्रांतहीन ।।२५३।।
अनावर प्रामाणिक । कांहीं प्रेमळ कडक ।।२५४।।
कांहीं व्यवहारप्रिय । कांहीं तटस्थ निष्क्रिय ।।२५५।।

---

१ स्वतःची रूपें.	२ पडदा.	३ प्रेमाच्या भरांत असलेला.	४ अमर्याद; अपार.

कांहीं दक्ष कांहीं [१] मूढ । कांहीं सोपीं कांहीं गूढ ।।२५६।।
कांहीं उदार कंजूष । कांहीं रागीट विशेष ।।२५७।।
कांहीं सौम्य आणि शांत । कांहीं देख मदोन्मत्त ।।२५८।।
कांहीं बोलती गर्जून । कांहीं स्वीकारिती मौन ।।२५९।।
कांहीं स्तब्ध चि साचार । कांहीं [२] आनंद-निर्भर ।।२६०।।
कांहीं लोभिष्ट विरक्त । कांहीं जागीं कांहीं [३] सुप्त ।।२६१।।
कांहीं संतुष्ट प्रसन्न । कांहीं कष्टी आणि खिन्न ।।२६२।।
कांहीं अशस्त्र सशस्त्र । कांहीं तल्लीन विचित्र ।।२६३।।
कांहीं तामसी स्नेहाळ । कांहीं अक्राळविक्राळ ।।२६४।।
कांहीं उत्पत्तीचा खेळ । खेळती गा सर्वकाळ ।।२६५।।
कांहीं संरक्षणशील । प्रेमें करिती सांभाळ ।।२६६।।
कांहीं संहारकार्यांत । देख आवेशें वर्तत ।।२६७।।
कांहीं देख साक्षीभूत । सर्व कर्मीं अनासक्त ।।२६८।।
ऐसीं नानाविध । आणि असंख्यात । स्वरूपें तीं येथ । देख माझीं ।।२६९।।
आतां देख देख । आणिक तीं माझीं । प्रकाशती जीं जीं । दिव्य तेजें ।।२७०।।
तयांचे जे वर्ण । ते हि भिन्न भिन्न । कैसे विलक्षण । देख देख ।।२७१।।
[४] तप्तभांगारापरिस । कांहीं तेजस्वी तांबूस ।।२७२।।
जैसें संध्यासमयास । दिसे शेंदरें आकाश ।।२७३।।
तैसीं देख हीं साचार । कांहीं पिंगट अपार ।।२७४।।
जैसें दिव्य माणिकांनीं । जातां ब्रह्मांड भरोनि ।।२७५।।
तेज फांके अनिवार । तैसीं सहज सुंदर ।।२७६।।
कांहीं केशरी उत्तम । देख अरुणोदयासम ।।२७७।।
कांहीं देख शुभ्रवर्ण । शुद्ध स्फटिकासमान ।।२७८।।
इंद्रनीळासम कांहीं । रूपें सुनीळ हीं पाहीं ।।२७९।।
कांहीं देख काळींकुट्ट । जणूं काजळाचें कीट ।।२८०।।

---

१ बेसावध. २ आनंदांत गढलेलीं. ३ झोंपलेलीं. ४ तापलेल्या सोन्यासारखी.

कांहीं रक्तवर्ण लाल । जैसें जास्वंदीचें फूल ।।२८१।।
कांहीं देख पीतवर्ण । दिव्य कांचनासमान ।।२८२।।
कांहीं नव-मेघांसम । देख श्यामल परम ।।२८३।।
कांहीं देख गौरवर्ण । शुभ्रचंपकासमान ।।२८४।।
जैसे [१] हरित तृणांकुर । तैसीं कांहीं हिरवींगार ।।२८५।।
तप्त-ताम्र तैसीं देख । कांहीं तांबडीं आणिक ।।२८६।।
कांहीं श्वेतचंद्रासम । देख निर्मल उत्तम ।।२८७।।
ऐसीं पार्था देख देख । माझीं स्वरूपें अनेक ।।२८८।।

विविध वर्णांचीं । माझीं रूपें पाहीं । तैशा आकृति हि । भिन्न भिन्न ।।२८९।।
लाजोनि मदन । खालीं घाली मान । जयांतें पाहोन । धनंजया ।।२९०।।
ऐसीं सुकुमार । सुंदर हीं देख । बांधा हि सुरेख । जयांचा गा ।।२९१।।
आणि तुळतुळीत । जयांचें शरीर । ऐसीं मनोहर । स्वरूपें हीं ।।२९२।।
[२] शृंगार-श्रियेचीं । जणूं भांडारें हीं । उघडलीं पाहीं । आज येथें ।।२९३।।
देख हीं गोंडस । आणि गुबगुबीत । कांहीं किडकिडीत । आणि शुष्क ।।२९४।।
अत्यंत विक्राळ । आणि दीर्घकंठ । [३] विताळ [४] विकट । तैसीं देख ।।२९५।।
ऐसीं स्वरूपें हीं । नानाविधाकृति । पाहूं जातां मिति । नाहीं तयां ।।२९६।।
अंग-प्रत्यंगांत । तयांचिया पाहें । सामावलें आहे । विश्व सारें ।।२९७।।

पश्याऽऽदित्यान्वसून्रुद्रानश्विनौ मरुतस्तथा ।
बहून्यदृष्टपूर्वाणि पश्याऽऽश्चर्याणि भारत ।।६।।

विश्वरूपाची ह्या । उघडतां दृष्टि । पसरती सृष्टि । आदित्यांच्या ।।२९८।।
मग मागुतीं ती । मिटोनि जातां च । सर्व हि त्या साच । लया जाती ।।२९९।।
१९ देख मुखींचिया । तीव्र वाफेसवें । होतसे आघवें । ज्वालामय ।।३००।।
तया ज्वालेमाजीं । पावकादि मग । * अष्टवसु-वर्ग । जन्म पावे ।।३०१।।
आणि क्रोधावेगें । जेव्हां एकत्रित । यावया पहात । [५] भ्रू-लताग्रें ।।३०२।।
तेव्हां तेथें रुद्र-। गणांचा संभार । होतसे साचार । अवतीर्ण ।।३०३।।

---

*परिशिष्ट पहा. १ हिरवे. २ शृंगाराच्या वैभवाचीं. ३ मोठ्या टाळूंचीं. ४ भयंकर. ५ भुवयांची टोकें.

* अश्विनीकुमार । होती असंख्यात । कैसे ओलाव्यांत । सौम्यतेच्या ॥३०४॥
आणि नानाविध । वायू कानांतून । पांडवा निर्माण । होती देख ॥३०५॥
ह्यापरी एकैक । स्वरूपाची लीला । * सुर-सिद्ध-कुळा । जन्म देई ॥३०६॥
ऐशीं हीं विशाळ । स्वरूपें साचार । अर्जुना अपार । देख माझीं ॥३०७॥
जया स्वरूपांचें । कराया वर्णन । वेद ते हि जाण । असमर्थ ॥३०८॥
काळाचें आयुष्य । पडे थोकडें च । पहावया साच । स्वरूपें जीं ॥३०९॥
आणि सृष्टिकर्त्या । ब्रह्मदेवातें हि । सांपडे ना कांहीं । ठाव ज्यांचा ॥३१०॥
तीन हि देवांच्या । येती ना जीं कानीं । देख तीं नयनीं । स्वरूपें हीं ॥३११॥
आणि आश्चर्यांच्या । ऐश्वर्याचा भोग । घेईं येथें चांग । कौतुकें तूं ॥३१२॥

इहैकस्थं जगत्कृत्स्नं पश्याद्य सचराचरम् ।
मम देहे गुडाकेश यच्चान्यद्द्रष्टुमिच्छसि ॥७॥

कल्पवृक्षातळीं । जैसें तृणांकुर । वाढावे अपार । धनंजया ॥३१३॥
विश्वरूपाचिया । रोम-मूळीं तैशा । वाढल्या ह्या कैशा । सृष्टि देख ॥३१४॥
वातें परमाणु । होतां खालींवर । दिसती अपार । [१] कडोशांत ॥३१५॥
तैसीं ब्रह्मांडें हीं । करिती भ्रमण । सांध्यासांध्यांतून । [२] प्रत्यंगाच्या ॥३१६॥
येथ एक एक । देख अंग-प्रांतीं । विश्वाची [३] संभूति । सविस्तर ॥३१७॥
आणि विश्वाच्या हि । पलीकडे कांहीं । वाटे जरी तें हि । देखावेंसें ॥३१८॥
तरी तयाची हि । तुज वाण नाहीं । देख माझ्या देहीं । आवडे तें ॥३१९॥
विश्वरूपधारी । ऐसा दयाघन । बोले जनार्दन । पार्थालागीं ॥३२०॥
तंव देखें किंवा । न देखें हें कांहीं । न सांगतां राही । स्तब्ध पार्थ ॥३२१॥
येथें कां हा ऐसा । राहिलासे स्तब्ध । म्हणोनि गोविंद । पाहे जेव्हां ॥३२२॥
तेव्हां दिसे लेणें । [४] आर्तीचें लेवोन । राहिला अर्जुन । तैसा चि तो ॥३२३॥

न तु मां शक्यसे द्रष्टुमनेनैव स्वचक्षुषा ।
दिव्यं ददामि ते चक्षुः पश्य मे योगमैश्वरम् ॥८॥

मग मनीं म्हणे । पार्थाची उत्कंठा । नाहीं च सर्वथा । ओहटली ॥३२४॥

---

१ झरोक्यांतून पडणाऱ्या प्रकाशाच्या किरणांत. २ प्रत्येक अवयवाच्या. ३ उत्पत्ति. ४ उत्कट इच्छेचें.

अजून हि नित्य–। सिद्धानंद-मार्ग । ह्यासी नाहीं चांग । सांपडला ॥३२५॥
विश्वरूप तरी । दाखविलें भलें । परी आकळलें । नाहीं ह्यासी ॥३२६॥
जाणोनि हें देव । श्रीकृष्ण हांसले । हांसोनि बोलिले । तयालागीं ॥३२७॥
विश्वरूप तरी । दाखविलें साच । परी देखसी च । ना तें पार्था ॥३२८॥
तंव तो चतुर । म्हणे नारायणा । सांगा कमीपणा । कोणासी हा ? ॥३२९॥
बगळ्याकडोन । कैसें भगवंता । सेववूं पहातां । चंद्रामृत ? ॥३३०॥
देवा तुम्ही कैसा । पुसोनि आरसा । दावूं पहातसां । आंधळ्यासी ? ॥३३१॥
किंवा बहिऱ्यासी । कैसें रमाकांता । ऐकवूं पहातां । गोड गान ? ॥३३२॥
[1] दर्दुरासी वायां । [2] मकरंद-कण । खावया घालोन । काय लाभ ? ॥३३३॥
आतां रागेजावें । कैसें कोणावरी । पहावें अंतरीं । विचारून ? ॥३३४॥
जयालागीं शास्त्रें । बोलती साचार । इंद्रियां गोचर । नव्हे ऐसें ॥३३५॥
आणि जें केवळ । ज्ञानदृष्टीच्या च । [3] भागा आलें साच । विश्वरूप ॥३३६॥
चर्मचक्षूंपुढें । ठेविलें तें तुम्हीं । मग देखावें मीं । कैसें सांगा ? ॥३३७॥
परी नये बोलूं । तुमचें हें न्यून । सोसावें आपण । हें चि भलें ॥३३८॥
तंव देव म्हणे । बोलसी जें पार्था । मान्य तें सर्वथा । आम्हांलागीं ॥३३९॥
तुज विश्वरूप । दाखवाया येथ । जाहलों प्रवृत्त । जंव आम्ही ॥३४०॥
तंव तें पहाया । दिव्य-ज्ञान-दृष्टि । आधीं हवी होती । द्यावयासी ॥३४१॥
परी प्रेमरंगीं । बोलतां साचार । पडला विसर । मज त्याचा ॥३४२॥
धनंजया भूमि । चोखाळिल्याविण । काय तें पेरून । बीज तेथें ? ॥३४३॥
तरी आतां माझें । विश्वरूप साच । देखसी ऐसी च । दृष्टि देऊं ॥३४४॥
आमुचा ऐश्वर्य–। योग पाहें मग । लाभतां ती चांग । दिव्य-दृष्टि ॥३४५॥
ऐश्वर्ययोगाचें । घडतां दर्शन । अनुभव पूर्ण । घेईं त्याचा ॥३४६॥
वेदान्तासी [4] वेद्य । सर्व-लोक-आद्य । जगाचें आराध्य–। दैवत जो ॥३४७॥
तेणें कृष्णनाथें । भक्त-प्रेमोल्हासें । सांगितलें ऐसें । पार्थालागीं ॥३४८॥

संजय उवाच–

---

१ बेडकाला. २ फुलांतील केसर. ३ वांट्याला आले; मिळालें. ४ जाणावयाजोगा.

एवमुक्त्वा ततो राजन्महायोगेश्वरो हरिः ।
दर्शयामास पार्थाय परमं रूपमैश्वरम् ।।९।।

संजय तो म्हणे । विस्मय हा फार । मज वारंवार । कौरवेशा ।।३४९।।
कीं ह्या त्रिलोकांत । दुजी लक्ष्मीहून । भाग्यवती कोण । असे काय ? ।।३५०।।
किंवा श्रुतिवीण । जगीं दुजें कोण । वर्णावया खूण । असे [1] पात्र ? ।।३५१।।
किंवा सेवकांत । शेषाहून थोर । नसे चि साचार । दुजा कोणी ।।३५२।।
देवाचिया [2] सोसें । जैसे योगी-जन । तैसें दुजें कोण । शिणे नित्य ? ।।३५३।।
किंवा ऐसा कोण । गरुडासमान । घेई जो वाहून । स्वामीकाजीं ? ।।३५४।।
परी सर्व हि तें । ठेवोनि बाजूस । पांडवांचा दास । झाला देव ! ।।३५५।।
देखा तयांसी च । जन्मल्यापासोन । लाभलें संपूर्ण । कृष्ण-प्रेम ।।३५६।।
स्त्रियेच्या आधीन । जैसा कामीजन । तैसा पार्थाधीन । झाला देव ! ।।३५७।।
तैसा पढविला । पक्षी हि बोले ना । जैसा हा अर्जुना–। संगें बोले ।।३५८।।
पाळिला जो पशु । स्वयें क्रीडेसाठीं । राहे ना तो [3] मुठी–। माजीं ऐसा ।।३५९।।
कळेना तो कैसा । भाग्याचा उत्कर्ष । लाभला पार्थास । आज येथें ।।३६०।।
पूर्ण परब्रह्म । भोगावया भली । भाग्यवती झाली । ह्याची दृष्टि ।।३६१।।
अर्जुनाचे शब्द । देव कैसे झेली । पुरवितो आळी । घेई जी जी ।।३६२।।
पार्थ कोपे तरी । निमूट तो साहे । रुसे तरी आहे । [4] बुझावीत ।।३६३।।
लागलें पार्थाचें । देवालागीं पिसें । नवल हें कैसें । देखें राजा ! ।।३६४।।
जन्मल्यापासोन । जे का [5] जितेंद्रिय । ऐसे ऋषिवर्य । शुकादिक ।।३६५।।
ते हि श्रीहरीचे । होवोनियां भाट । वर्णिती अवीट । रासक्रीडा ।।३६६।।
नित्य समाधींत । भोगिती अक्षय । जयाचें ऐश्वर्य । योगीराज ।।३६७।।
तो हा पार्थाधीन । झाला कैसा आज । नवल हें मज । वाटतसे ।।३६८।।
परी नवल हें । नको वाटावया । मज येथें राया । कौरवेशा ।।३६९।।
स्वयें कृष्णनाथें । जया स्वीकारावें । तयें ऐसें व्हावें । भाग्यवंत ।।३७०।।
म्हणोनियां बोले । देवेश तो पार्था । तुज देऊं आतां । दिव्य-दृष्टि ।।३७१।।

---

१ योग्य. २ हव्यासानें. ३ पूर्णपणें ताब्यांत. ४ समजावीत. ५ इंद्रियें ताब्यांत राखणारे.

जेणें विश्वरूप । देखावया चांग । होसील तूं मग । समर्थ कीं ।।३७२।।
वासुदेवाचिया । मुखांतूनि साच । ऐसीं निघतां च । अक्षरें हीं ।।३७३।।
पार्थ-हृदयींचा । अविद्या-अंधार । लोपला साचार । एकाएकीं ।।३७४।।
तेणें विश्वनाथें । ह्यापरी आपुलें । ऐश्वर्य दाविलें । पार्थालागीं ।।३७५।।
दिव्य विश्वरूप । हा महा-सागर । सर्व अवतार । लाटा त्याच्या ।।३७६।।
विश्वरूप-सूर्या–। मुळें चि केवळ । जग-मृग-जळ । भासतसे ।।३७७।।
अनादि ज्या नीट । [1] भूमिकेवरतीं । [2] चराचराकृति । उमटते ।।३७८।।
तें चि विश्वरूप । आपुल्या ठिकाणीं । दावी चक्र-पाणि । पांडवासी ।।३७९।।
मागें बाळपणीं । देव हा श्रीकृष्ण । * मृत्तिका-भक्षण । करी जेव्हां ।।३८०।।
यशोदामातेनें । तेव्हां रागेजोन । सांगतां वदन । उघडाया ।।३८१।।
झाडा द्यावयाचें । करोनि निमित्त । तेणें भीतभीत । तिजलागीं ।।३८२।।
निज-मुखामाजीं । सावकाशपणें । * चौदा हि भुवनें । दावियेलीं ।।३८३।।
किंवा मधु-वनीं । ध्रुवाचिया गाला । शंखें स्पर्श केला । नारायणें ।।३८४।।
तों चि वेदांची हि । खुंटे जेथें मति । ऐसी दिव्य स्तुति । करूं लागे ।।३८५।।
तैसा [3] अनुग्रह । भगवंतें केला । तेणें पार्थ झाला । प्रज्ञावंत ।।३८६।।
आतां पाहूं जातां । मायेचा आभास । दिसेना तयास । कोठें हि तो ।।३८७।।
एकाएकीं विश्व–। रूपाचें तें तेज । सर्वत्र सहज । प्रकटलें ।।३८८।।
तिये वेळीं मग । चमत्कारमय । आघवें चि होय । पार्थालागीं ।।३८९।।
तयाचें तों चित्त । जाहलें तटस्थ । बुडोनि गर्दीत । विस्मयाच्या ।।३९०।।
जैसा एकटा च । ब्रह्मांडोदकांत । राहिला पोहत । * मार्कंडेय ।।३९१।।
तैसा लोळतसे । पार्थ तेथें तया । विश्वरूपाचिया । कौतुकांत ।।३९२।।
म्हणे येथें होतें । केवढें गगन । नेलें तें हिरोन । कोणें कोठें ? ।।३९३।।
स्थावर-जंगम । सर्व गेलें कोठें । पंच-महा-भूतें । काय झाली ? ।।३९४।।
हारपले सर्व । दिशांचे हि ठाव । नेणों [4] अध-ऊर्ध्व । गेले कोठें ? ।।३९५।।
जाग येतां स्वप्न । मावळे साचार । तैसे लोकाकार । हारपले ।।३९६।।

---

* परिशिष्ट पहा. १ आधारावर. २ स्थावर जंगम सृष्टीचा आकार. ३ कृपा. ४ खालचीवरची दिशा.

चंद्रासवें जैसें । लोपे तारांगण । सूर्यनारायण । प्रकाशतां ॥३९७॥
तैसी प्रपंचाची । रचना संपूर्ण । टाकिली गिळून । विश्वरूपें ॥३९८॥
तेव्हां मनपण । मना आठवेना । बुद्धि हि आपणा । विसरली ॥३९९॥
इंद्रियांच्या वृत्ति । वळोनि माघारीं । सकळ अंतरीं । सांठवल्या ॥४००॥
आणि [1] ताटस्थ्यासी । ताटस्थ्य पडलें । [2] टकासी लागलें । [2] टक तेव्हां ॥४०१॥
जणूं मोहनास्त्र । पडोनि साचार । सर्व हि विचार । स्तब्ध झाले ॥४०२॥
ह्यापरी विस्मित । होवोनि कौतुकें । जंव पुढां देखे । चतुर्भुज ॥४०३॥
तंव तें चि दिसे । नानारूप झालें । मांडोनिया ठेलें । चोहींकडे ॥४०४॥
वर्षाकाळीं जैसी । पर्जन्याची वृष्टि । सकळ हि सृष्टि । व्यापीतसे ॥४०५॥
किंवा कल्पांतींचें । तेज तें चौफेर । जैसें अनिवार । वाढतसे ॥४०६॥
आपणावांचोन । तैसें दुजें कांहीं । उरूं दिलें नाहीं । भगवंतें ॥४०७॥
प्रथम तो पार्थ । पावे समाधान । स्व-स्वरूपीं लीन । होवोनियां ॥४०८॥
मग निज-नेत्र । उघडोनि पाहे । तंव देखताहे । विश्वरूप ॥४०९॥
ह्या चि दोहीं डोळां । पहावें सकळ । अद्‌भुत विशाळ । विश्वरूप ॥४१०॥
निज-भक्ताचें हें । थोर मनोगत । पुरवी श्रीकांत । ऐशा रीती ॥४११॥

अनेकवक्त्रनयनमनेकाद्‌भुतदर्शनम् ।
अनेकदिव्याभरणं दिव्यानेकोद्यतायुधम् ॥१०॥

तया विश्वरूपीं । मग पंडु-सुत । [3] आननें बहुत । देखतसे ॥४१२॥
जणूं रम्यतेचीं । राजमंदिरें च । तैसीं मुखें साच । श्रीहरीचीं ॥४१३॥
लावण्य-श्रियेचीं । ना तरी तीं साच । जणूं भांडारें च । प्रकटलीं ॥४१४॥
किंवा आनंदाचीं । वनें भरा आलीं । राज्य-प्राप्ति झाली । सौन्दर्यासी ॥४१५॥
तैसीं मनोहर । वदनें सुंदर । देखिलीं अपार । धनंजयें ॥४१६॥
तेविं आणिक हि । देखिलीं अनेक । मुखें भयानक । स्वभावें जीं ॥४१७॥
प्रळय-रात्रीचीं । सैन्यें उठावलीं । किंवा मुखें झालीं । मृत्यूसी च ॥४१८॥
जणूं [4] भय-दुर्ग । रचिले प्रचंड । उघडलें कुंड । काळाग्नीचें ॥४१९॥

---

१ स्तब्धतेला. २ एकाग्रतेला एकाग्रता आली. ३ तोंडे. ४ भयाचे किल्ले.

तैसीं अत्यद्‌भुत । आणि भयंकर । देखिलीं अघोर । मुखें तेणें ॥४२०॥
तेविं असामान्य । अलंकारयुक्त । देखिलीं बहुत । शांत सौम्य ॥४२१॥
ज्ञान-दृष्टीनें हि । पाहूं जातां नीट । लागे ना शेवट । मुखांचा त्या ॥४२२॥
म्हणोनियां मग । जंव तो अर्जुन । कौतुकें लोचन । पाहूं लागे ॥४२३॥
विविध वर्णांचीं । तंव नित्य नवीं । जणूं [१] विकसावीं । पद्‌म-वनें ॥४२४॥
किंवा आदित्यांच्या । शोभिवंत पंक्ति । तैसी नेत्र-कांति । दिसे तया ॥४२५॥
चमकावी जैसी । प्रळय-विद्युत्‌ । काळ्याकुट्ट दाट । मेघांमाजीं ॥४२६॥
तैसी लखलखीत । अग्निवर्ण दृष्टि । दिसे तळवटीं । भुवयांच्या ॥४२७॥
ऐसें एकएक । अद्‌भुत आश्चर्य । जंव धनंजय । पाहे तेथें ॥४२८॥
तंव दर्शनें तीं । देखे नानाविध । एका चि अगाध । विश्व-रूपीं ॥४२९॥
कोठें तो मुकुट । कोणीकडे बाहु । म्हणे आतां पाहूं । पाय ते हि ॥४३०॥
दर्शनाची इच्छा । ऐसी वाढवीत । जाय पंडुसुत । आवडीनें ॥४३१॥
काय मनोरथ । होतील ते व्यर्थ । तया भाग्यवंत । अर्जुनाचे ॥४३२॥
काय [२] वायबाण । असतील राया । महादेवाचिया । भात्यामाजीं ॥४३३॥
किंवा काय मिथ्या । अक्षरांचे सांचे । बह्म्याचिया वाचे–। माजीं होती ॥४३४॥
म्हणोनि तो पार्थ । देखतसे तेथ । संपूर्ण साद्यन्त । विश्वरूप ॥४३५॥
नाकळे वेदांसी । ज्याचा अंत पार । विश्वरूप थोर । ऐसें जें का ॥४३६॥
तयाचें सर्वांग । तेथें एके वेळे । निरखिती डोळे । अर्जुनाचें ॥४३७॥
चरणापासोन । मुकुटापर्यंत । थोरवी पहात । रूपाची त्या ॥४३८॥
जें कां विश्वरूप । दिसे शोभिवंत । रत्नीं अलंकृत । नानाविध ॥४३९॥
होवोनि साकार । परब्रह्में तेणें । लेइलीं भूषणें । स्वरूपाचीं ॥४४०॥
तया भूषणांचें । कराया वर्णन । मज [३] उपमान । सांपडेना ॥४४१॥
जेणें चंद्रादित्य–। मंडळासी [४] दीप्ति । ऐसी दिव्य कांति । तेजाची ज्या ॥४४२॥
महा-तेजाचें हि । होय जें [५] जिव्हार । प्रकटे साचार । विश्व जेणें ॥४४३॥
ऐसा भव्य-दिव्य । तेजाचा शृंगार । जो का अगोचर । बुद्धीलागीं ॥४४४॥

---

१ फुलावीं. २ फुसके बाण. ३ उदाहरण; दृष्टांत. ४ तेज. ५ जीवनकला.

स्वयें चि तो तेथें । करोनि धारण । नटलें निर्गुण । परब्रह्म ।।४४५।।
विश्वरूप ऐसें । येई प्रत्ययास । लाभतां पार्थास । दिव्य-दृष्टि ।।४४६।।
मग तो [१] सुधीर । सरळ सुंदर । पाहूं जाई कर । तंव तेथें ।।४४७।।
काळाग्नीच्या ज्वाळा । टाकिती छेदून । ऐसीं शस्त्रें तीक्ष्ण । झळाळती ।।४४८।।
तया किरणांच्या । अति तीक्ष्णपणें । उडती फुटाणे । [२] नक्षत्रांचे ।।४४९।।
देखोनि तें तेज । अग्नि भयभीत । म्हणे सागरांत । लपूं आतां ।।४५०।।
आल्या उसळोन । लाटा घनदाट । जणूं काळकूट । विषाच्या त्या ।।४५१।।
किंवा कल्पांतींच्या । विजांचें गहन । यावें उगवोन । रान जैसें ।।४५२।।
तैसे आयुधांनीं । सज्ज असंख्यात । देखतसे हात ।। पार्थ तेथें ।।४५३।।

दिव्यमाल्याम्बरधरं दिव्यगन्धानुलेपनम् ।
सर्वाश्चर्यमयं देवमनन्तं विश्वतोमुखम् ।।११।।

कंठ-मुकुटांतें । मग पाहूं लागे । घेवोनियां मागें । भयें दृष्टि ।।४५४।।
तंव तया वाटे । ह्याजपासोनि च । कल्पतरु साच । जन्म घेती ।।४५५।।
श्रांत रमा जेथें । घेतसे विसांवा । दिव्य पद्म-ठेवा । ऐसा जो का ।।।४५६।।
किंवा मूळपीठें । महा-सिद्धींचीं जीं । तैसीं फुलें ताजीं । सु-निर्मळ ।।४५७।।
प्रेमोल्हासें देव । [३] तुरंबीत आहे । ऐसें पार्थ पाहे । तिये वेळीं ।।४५८।।
नाना * पूजा-बंध । मस्तकावरतीं । शोभती मुकुटीं । पुष्प-गुच्छ ।।४५९।।
तेविं अलौकिक । दिव्यपुष्पमाळा । विराजती गळां । असंख्यात ।।४६०।।
सुवर्णें मेरूतें । जैसें मढवावें । स्वर्गें पांघरावें । सूर्य-तेज ।।४६१।।
तैसा शोभे कांसे । दिव्य पीतांबर । ऐसें [४] वीर-वर । देखतसे ।।४६२।।
कापुराची * उटी । घेवोनियां चांग । चर्चावें सर्वांग । शंकराचें ।।४६३।।
ना तरी कैलास–। पर्वतासी लेप । काढावा अमाप । [५] पारदाचा ।।४६४।।
किंवा क्षीरोदक । क्षीरसागरास । पांघरावयास । द्यावें जैसें ।।४६५।।
ना तरी घालावें । नभासी वेष्टन । घडी उकलून । चंद्रम्याची ।।४६६।।
तैसी तयाचिया । सर्वांगीं किरीटी । देखे शुभ्र उटी । चंदनाची ।।४६७।।

---

१ धैर्यवान अर्जुन. २ नक्षत्रें भाजून जात आहेत ३ वास घेत. ४ वीरश्रेष्ठ अर्जुन. ५ पाऱ्याचा.

आत्म-प्रकाशासी । जेणें चढे कांति । जेणें लाभे शांति । ब्रह्मानंदा ॥४६८॥
स्वयें [१] गंधवती । असोनि हि पृथ्वी । तियेतें जीववी । सुगंध जो ॥४६९॥
देव परब्रह्म । असोनि निर्लेप । स्वयें [२] अनुलेप । [२] करी ज्याचा ॥४७०॥
स्वभावें [३] अनंग । असोनि मदन । लावी जें चंदन । सर्वांगासी ॥४७१॥
तया चंदनाच्या । उटीचा सुगंध । सर्वथा अगाध । वानूं कैसा ॥४७२॥
पाहोनि एकैक । ऐसा दिव्य साज । गेला कपि-ध्वज । भांबावोनि ॥४७३॥
मग देव तेथें । उभा कीं बैसला । किंवा तो निजेला । हें हि नेणे ॥४७४॥
उघडोनि दृष्टि । चोहोंकडे पाहे । तंव देखताहे । मूर्तिमय ॥४७५॥
न पहावें आतां । म्हणोनि किरीटी । घेई जंव दृष्टि । मिटोनियां ॥४७६॥
तंव तया दिसे । आंत हि तैसें च । पसरलें साच । विश्वरूप ! ॥४७७॥
विश्वरूपाचीं तीं । मुखें असंख्यात । देखे पंडु-सुत । दृष्टीपुढें ॥४७८॥
म्हणोनि तो जंव । पाठमोरा होई । तंव तीं तेथें हि । दिसती च ॥४७९॥
तैसे च ते हात । तैसीं च तीं मुखें । चरण हि देखे । तैसे च ते ॥४८०॥
पाहे तें तें दिसे । विश्वरूपमय । नवल तें काय । असे येथें ॥४८१॥
परी जरी नेत्र । मिटोनियां राहे । तरी दिसताहे । तें चि रूप ! ॥४८२॥
आपुल्या कृपेची । थोरवी अपूर्व । पहा दावी देव । पार्थालागीं ॥४८३॥
तयाचें पाहणें । न पहाणें तें हि । तयासह घेई । व्यापोनि तो ॥४८४॥
म्हणोनियां एका । आश्चर्याच्या पूरीं । पडोनि बाहेरी । जंव ठाके ॥४८५॥
तंव तेथें दुज्या । चमत्काराचिया । जाय बुडोनियां । [४] महार्णवीं ॥४८६॥
निज-विश्वरूप । ऐशा रीति पूर्ण । कौशल्यें दावोन । पार्थालागीं ॥४८७॥
अनंत-स्वरूपी । देव तो श्रीकांत । व्यापोनियां घेत । तयातें हि ॥४८८॥
निज-विश्वरूप । दाखवावें मज । ऐसें [५] भीमानुज । प्रार्थी जंव ॥४८९॥
तंव आघवें चि । होवोनि आपण । नटे नारायण । सर्व-व्यापी ॥४९०॥
दीपाधारें किंवा । रवि-प्रकाशांत । पहाया समर्थ । दृष्टि जी का ॥४९१॥
ना तरी जी दृष्टि । मिटोनि घेतां च । दिसायाचें साच । खुंटतसे ॥४९२॥

---

१ सुगंधाने भरलेली. २ उटी लावी. ३ अवयवरहित. ४ महासागरांत. ५ अर्जुन.

ऐसी स्थूल-दृष्टि । नव्हती ती देखा । पार्थालागीं जी का । दिली देवें ॥४९३॥
म्हणोनि तो पार्थ । जैसा प्रकाशांत । तैसा अंधारांत । पाहूं शके ! ॥४९४॥
आणि जरी नेत्र । मिटोनियां घ्यावे । तरी हि दिसावें । तयालागीं ॥४९५॥
धृतराष्ट्राप्रति । हस्तिनापुरांत । सांगे ऐसी मात । संजय तो ॥४९६॥
म्हणे ऐकिलें का । काय सांगूं तरी । नाना अलंकारीं । शोभलें जें ॥४९७॥
सर्व हि बाजूंनीं । जयालागीं मुखें । विश्वरूप देखे । ऐसें पार्थ ॥४९८॥

दिवि सूर्यसहस्रस्य भवेद्युगपदुत्थिता ।
यदि भा: सदृशी सा स्याद्भासतस्य महात्मन: ॥१२॥

अहा ! तयाचिया । अंग-कांतीची ती । [1] अपूर्वता होती । निरुपम ॥४९९॥
कल्पान्ताच्या वेळीं । बारा आदित्यांचें । तेज होय साचें । एकत्रित ॥५००॥
तैसे ते सहस्र । दिव्य सूर्य जरी । एके [2] अवसरीं । प्रकटले ॥५०१॥
तरी तयांची हि । [3] न [3] साजे उपमा । एवढी महिमा । तेजाची त्या ॥५०२॥
सर्व हि विजांचा । मेळावा करून । सामुग्री घेऊन । काळाग्नीची ॥५०३॥
जरी दहा महा–। तेजांचा [4] संघात । केला एकत्रित । तयामाजीं ॥५०४॥
तरी तें तुळेल । तेज कांहीं अंशीं । सर्वांगप्रभेशीं । देवाचिया ॥५०५॥
परी संपूर्णत्वें । [5] तुल्य तें नव्हेच । त्रिवार हें साच । देख राया ॥५०६॥
प्रभु श्रीरंगाच्या । सर्वांगाचें तेज । ह्यापरी सहज । फांकतसे ॥५०७॥
*व्यासांचिया कृपे । तें चि दिव्य तेज । आज येथें मज । दृश्य झालें ॥५०८॥

तत्रैकस्थं जगत्कृत्स्नं प्रविभक्तमनेकधा ।
अपश्यद्देवदेवस्य शरीरे पाण्डवस्तदा ॥१३॥

तिये विश्वरूपीं । एकीकडे सारें । आपुल्या विस्तारें । जग दिसे ॥५०९॥
महोदधीमाजीं । बुडबुडे सान । जैसे भिन्न भिन्न । दृश्य होती ॥५१०॥
किंवा नभीं जैसी । *गंधर्व-नगरी । नातरी भूवरी । वारुळें तीं ॥५११॥
किंवा मेरूवरी । बारीक-बारीक । बैसावे अनेक । परमाणु ॥५१२॥
प्रभूचिया देहीं । तैसें सारें जग । पार्थ देखे मग । तिये वेळीं ॥५१३॥

---

*परिशिष्ट पहा.　१ नवेपणा; अद्भुतता.　२ वेळीं.　३ शोभणार नाहीं.　४ समुदाय.　५ बरोबरीचें.

ततः स विस्मयाविष्टो हृष्टरोमा धनंजयः ।
प्रणम्य शिरसा देवं कृताञ्जलिरभाषत ।।१४।।

**वेगळें तें विश्व । वेगळे आपण । ऐसें दुजेपण । होतें अल्प ।।५१४।।**
**तें हि गेलें मग । आटोनि संपूर्ण । एकाएकीं मन । मावळलें ।।५१५।।**
**होतां ब्रह्मानंद । अंतरीं जागृत । बाहेरी गलित । [१] गात्रें झालीं ।।५१६।।**
**पायांपासोनियां । मस्तकापर्यंत । होय रोमांचित । काया सारी ।।५१७।।**
**वर्षाकाळारंभीं । पर्वतावरून । पाणी ओघळून । जातां मग ।।५१८।**
**तयाचे सर्वांगीं । अति सुकुमार । जैसे तृणांकुर । विरूढती ।।५१९।।**
**तेथें पार्थाचिया । शरीरीं तैसे च । उठले रोमांच । तिये वेळीं ।।५२०।।**
**चंद्र-किरणांचा । स्पर्श होतां क्षणीं । चंद्रकांत मणि । द्रवे जैसा ।।५२१।।**
**[२] स्वेद-कणिकांनीं । आली डबडबून । पार्थाची संपूर्ण । [३] तनु तैसी ।।५२२।।**
**गुंततां भ्रमर । पद्म-कलिकेंत । मग ती जळांत । हाले जैसी ।।५२३।।**
**तैसा कांपे देह । बळें उसळतां । आनंदाच्या लाटा । अंतरांत ।।५२४।।**
**कापूरकेळीच्या । गाभारां साचार । दाटतां कापूर । मग जैसीं ।।५२५।।**
**तियेचीं सोपटें । सुटोनि त्यांतून । कापुराचे कण । ओघळती ।।५२६।।**
**तैसे अर्जुनाचे । [४] दाटोनि [४] लोचन । गळती त्यांतून । आनंदाश्रु ।।५२७।।**
**चंद्राचा उदय । होतां एकसरें । भरला चि भरे । [५] अब्धि जैसा ।।५२८।।**
**तैसा स्वानंदाचा । येवोनियां भर । पार्थ वारंवार । उचंबळे ।।५२९।।**
*** अष्ट सात्त्विकांची । ऐसी परस्पर । लागली साचार । चढाओढ ।।५३०।।**
**तेथें पार्थालागीं । पूर्ण-ब्रह्मानंद–। साम्राज्याचें पद । प्राप्त झालें ।।५३१।।**
**अद्वैतसुखाचा । ऐसा साक्षात्कार । पार्थासी साचार । भोगवोनि ।।५३२।।**
**कृपादृष्टिक्षेपें । देव-भक्तपण । ठेविलें राखोन । पुन्हां देवें ।।५३३।।**
**मग दीर्घ श्वास । टाकोनि किरीटी । लावी एकदृष्टि । देवाकडे ।।५३४।।**
**होता जिये स्थानीं । बैसला तो पार्थ । तेथोनि च हात । जोडोनियां ।।५३५।।**
**तेविं नमवोनि । मस्तक आपुलें । काय पुन्हां बोले । देवालागीं ।।५३६।।**

---

१ अवयव. २ घामाच्या बिंदूंनीं. ३ शरीर. ४ डोळे भरून येऊन. ५ समुद्र.

अर्जुन उवाच–
पश्यामि देवांस्तव देव देहे
सर्वांस्तथा भूतविशेषसङ्घान् ।
ब्रह्माणमीशं कमलासनस्थ–
मृषींश्च सर्वानुरगांश्च दिव्यान् ॥१५॥

**म्हणे प्रभो तुझा । असो जयजयकार । तुझी कृपा थोर । मजवरी ॥५३७॥**
**सर्वेश्वरा मी तों । असोनि [१] प्राकृत । देखिलें अद्‌भुत । विश्वरूप ॥५३८॥**
**विश्वासी आश्रय । होसी एकला च । पाहिलें हें साच । आज येथें ॥५३९॥**
**स्वभावें संतोष । झाला माझ्या जीवा । भलें केलें देवा । कृपा-सिंधो ॥५४०॥**
**[२] मंदराचळाच्या । जैसीं आश्रयानें । ठायीं ठायीं रानें । [३] श्वापदांचीं ॥५४१॥**
**तैसे तुझ्या देहीं । इंद्रलोकादिक । लोक हे अनेक । देखतसें ॥५४२॥**
**अंतराळामाजीं । नाना ग्रह-गण । एकत्र दिसून । येती जैसे ॥५४३॥**
**किंवा महावृक्षीं । जैसीं छोटीं छोटीं । दिसावीं घरटीं । पाखरांचीं ॥५४४॥**
**तैसे देवगणां–। समवेत स्वर्ग । देखतसें चांग । तुझ्या देहीं ॥५४५॥**
**प्रभो पंचमहा–। भूतांचीं पंचकें । अनेक मी देखें । तुझ्या ठायीं ॥५४६॥**
**आणि एक एक । भूत-सृष्टींतील । प्राण्यांचे सकल । समुदाय ॥५४७॥**
**देखिला हा काय । ब्रह्मदेव नोहे । तुजमाजीं आहे । सत्यलोक ॥५४८॥**
**आणि दुज्या ठायीं । पाहूं जातां तेथें । दिसे प्रभो मातें । कैलास हि ॥५४९॥**
**[४] भवानीसहित । शंभु भोलानाथ । पाहतसें तेथ । एके भागीं ॥५५०॥**
**आणि हृषीकेशी । नवल हें पाहीं । देखिलें तुज हि । तुजमाजीं ॥५५१॥**
**देखें कश्यपादि । सर्व ऋषि-कुळें । देखें हीं पाताळें । नागांसह ॥५५२॥**
**काय सांगूं फार । त्रैलोक्य-पालका । तुझिया एकैका । [५] अंग-प्रांतीं ॥५५३॥**
**देखें भिंतीवरी । जैशा चित्राकृति । तैसे उमटती । * चौदा लोक ॥५५४॥**
**आणि तयांतील । प्राणी जे का नाना । चित्रांची रचना । जणूं ती च ॥५५५॥**
**ऐसा असामान्य । तुझा थोरपणा । देवा नारायणा । देखतसें ॥५५६॥**

---

१ सामान्य.　२ मंदर पर्वताच्या.　३ हिंस्त्र पशूंचीं.　४ पार्वती.　५ अवयवावर.

अनेकबाहूदरवक्त्रनेत्रं
पश्यामि त्वां सर्वतोऽनन्तरूपम् ।
नान्तं न मध्यं न पुनस्तवादिं
पश्यामि विश्वेश्वर विश्वरूप ॥१६॥

दिव्यदृष्टीचिया । बळें प्रभो ऐसें । जंव पाहतसें । चोहींकडे ॥५५७॥
तंव तुझ्या भव्य । बाहुदंडीं कैसें । आकाश हें दिसे । अंकुरलें ॥५५८॥
आणि नवल हें । पाहतों अद्‌भुत । कैसे तुझे हात । एकले चि ॥५५९॥
एका चि समयीं । सर्व ही व्यापार । करिती साचार । निरंतर ॥५६०॥
जणूं उघडावीं । ब्रह्मांड-भांडारें । अपार विस्तारें । ब्रह्माचिया ॥५६१॥
तैसीं अमर्याद । तुझीं मोठीं पोटें । देखतसें येथें । स्पष्टपणें ॥५६२॥
सहस्र-शीर्षांचीं । देखतों रूपें तीं । एका वेळीं होती । कोट्यवधि ॥५६३॥
किंवा मुखरूपी । फळांनीं दाटून । यावें जणूं पूर्ण । परब्रह्म ॥५६४॥
तैसीं चोहींकडे । तुझीं दिव्य मुखें । आणि [१]नाना देखें । [२]नेत्र-पंक्ति ॥५६५॥
हा तों स्वर्ग, ही तों । भूमि, हें पाताळ । हें तों अंतराळ । दिशा कीं ह्या ॥५६६॥
ऐसें बोलायाची । राहिली ना सोय । विश्वरूपमय । सर्व झालें ॥५६७॥
अणु एवढा हि । अवकाश रिता । येथें भगवंता । तुजविण ॥५६८॥
शोधितां हि मज । सांपडेना देवा । व्यापिलें हें तुवां । ऐसें सर्व ॥५६९॥
नाना परी महा–। भूतांचा अपार । जेवढा विस्तार । सांठवला ॥५७०॥
देखतसें येथें । प्रभो तेवढा हि । भरोनियां राही । तुझ्या रूपें ॥५७१॥
ऐसा तूं आलासी । कोणे [३]ठायाहून । उभा कीं बैसोन । राहिलासी ? ॥५७२॥
होतासी तूं कोणा । मातेचिया पोटीं । केवढी आकृति । होय तुझी ? ॥५७३॥
कैसें तुझें रूप । किती तुझें वय । पलीकडे काय । असे तुझ्या ? ॥५७४॥
कशावरी येथें । आहेसी तूं देव । लागलों मी जंव । पाहूं ऐसें ॥५७५॥
तंव देखिलें मीं । सर्व कांहीं तूं च । तुझा ठाव साच । तूं च होसी ॥५७६॥
नव्हेसी कोणाचा । अनादि तूं प्रभु । होसी तूं [४]स्वयंभू । हृषीकेशा ॥५७७॥

---

१ अनेक; पुष्कळ.　२ डोळ्यांच्या रांगा.　३ ठिकाणाहून.　४ मूळचा; स्वतः उत्पन्न होणारा.

उभा ना तूं [१] बैठा । ठेंगणा ना उंच । तळीं वरी साच । तूं च होसी ॥५७८॥
देवा तुझें रूप । तुझ्या सारिखें च । वय हि तैसें च । होय तुझें ॥५७९॥
पाठी पोट तुझें । तूं चि भगवंता । आघवें अनंता । तुझें तूं च ॥५८०॥
हें चि वारंवार । देखिलें साचार । काय सांगूं फार । तुज आतां ॥५८१॥
परी एक न्यून । तुझ्या स्वरूपांत । आदि मध्य अंत । तिन्ही नाहीं ॥५८२॥
तयां सर्वां ठायीं । भलें शोधितां हि । सांपडले नाहीं । मज कोठें ॥५८३॥
म्हणोनि ते तिन्ही । नाहींत हें साच । त्रिवार ऐसें च । मज वाटे ॥५८४॥
ऐशापरी आदि–। मध्यान्त-रहिता । अपार अच्युता । नारायणा ॥५८५॥
त्रैलोक्य-नायका । विश्वरूपा आतां । देखिलें तत्त्वतां । तुजलागीं ॥५८६॥
देखतसें देवा । मूर्ति किती तरी । तुझ्या देहावरी । उमटल्या ॥५८७॥
जणूं नानाविध । वर्णांचीं विचित्रें । पांघरिसी वस्त्रें । ऐसें वाटे ॥५८८॥
तुझ्या स्वरूपाच्या । [२] महोदधीवरी । उठती लहरी । मूर्तिरूप ॥५८९॥
किंवा मूर्तिरूप । फळांनीं तूं देवा । शोभसी बरवा । जणूं वृक्ष ॥५९०॥
व्यापिलें प्राण्यांनीं । जैसें पृथ्वीतळ । किंवा अंतराळ । नक्षत्रांनीं ॥५९१॥
तैसें तुझें रूप । असंख्य मूर्तींनीं । राहिलें भरोनि । देखतसें ॥५९२॥
एकैक मूर्तीच्या । अंग-प्रांतीं होय । आणि लया जाय । त्रैलोक्य हें ॥५९३॥
एवढ्या त्या मूर्ति । परी [३] रोमाऐशा । जाहल्या विश्वेशा । तुझ्या देहीं ॥५९४॥
ऐसा विश्वाचा हा । पसारा मांडोन । राहिलासी कोण । कोणाचा तूं ? ॥५९५॥
पाहिलें हें तंव । कळों आलें साच । सारथी तूं तो च । आमुचा गा ॥५९६॥
तरी वाटे मज । पाहतां मुकुंदा । ऐसा चि सर्वदा । व्यापक तूं ॥५९७॥
परी धरिसी तूं । सगुण स्वरूपा । करावया कृपा । भक्तांवरी ॥५९८॥
रूप चतुर्भुज । सांवळें देखून । निवती नयन । आणि मन ॥५९९॥
मग प्रेम-भावें । देऊं जातां मिठी । कैसा जगजेठी । सांपडसी ? ॥६००॥
प्रभो तूं चि ऐसें । रूप सुकुमार । धरिसी सुंदर । कृपा-सिंधो ॥६०१॥
परी तुजलागीं । लेखितों सामान्य । दोष [४] दृष्टिजन्य । आमुचा हा ॥६०२॥

------------------------------------------------

*परिशिष्ट पहा. १ बसलेला. २ महासागरावर. ३ अंगावरील केसांप्रमाणें. ४ (जड) दृष्टीचा.

तरी आतां माझा । दृष्टि-दोष गेला । सहजें त्वां दिला । [१] दिव्यचक्षु ॥६०३॥
म्हणोनियां तुझी । थोरवी यथार्थ । पहाया समर्थ । झालों देवा ॥६०४॥
[२] मकर-तुंडाच्या । मागील बाजूसी । बैसला होतासी । रथीं जो तूं ॥६०५॥
तो चि तूं झालासी । विश्वरूप आज । कळलें हें मज । स्पष्टपणें ॥६०६॥

किरीटिनं गदिनं चक्रिणं च
तेजोराशिं सर्वतो दीप्तिमन्तम् ।
पश्यामि त्वां दुर्निरीक्ष्यं समन्ता–
द्दीप्तानलार्कद्युतिमप्रमेयम् ॥१७॥

तो चि नव्हे का हा । मस्तकीं मुकुट । ठेविला वैकुंठ–। नायका तूं ॥६०७॥
तयाचें तें तेज । आणि थोरपण । परि विलक्षण । दिसे आतां ॥६०८॥
जें का फिरवाया । जाहलासी सिद्ध । तें चि हें प्रसिध्द । चक्र हातीं ॥६०९॥
धरिसी तूं कैसें । मागें सांवरून । मोडे ना ती खूण । अजूनि हि ॥६१०॥
आणि प्रभो ती च । नव्हे का ही गदा । शोभते गोविंदा । दुज्या हातीं ॥६११॥
ते चि हे पुढील । नव्हेत का हात । आयुधें नाहींत । जयांमाजीं ॥६१२॥
परी ते हि कैसे । मागेंपुढें होत । लगामा धरीत । सांवरोनि ॥६१३॥
कृपा-सिंधो माझ्या । उत्कंठेचा भर । देखोनि साचार । एकाएकीं ॥६१४॥
दिव्य विश्वरूप । झालासी तूं स्वतां । ऐसें विश्वनाथा । जाणिलें मीं ॥६१५॥
काय हें नवल । कैसें विस्मयांत । बुडोनियां जात । चित्त माझें ॥६१६॥
परी आश्चर्य हि । करावया येथें । आहे कोठें मातें । अवकाश ! ॥६१७॥
आहे नाहीं दोन्ही । भाव हे गिळून । प्रकट होऊन । राहिलासी ॥६१८॥
कैसें तुझ्या दिव्य । स्वरूपाचें तेज । कोंदलें सहज । सर्वत्र हें ! ॥६१९॥
अग्नीची हि दृष्टि । करपोनि जाय । रवि लुप्त होय । [३] खद्योतसा ॥६२०॥
ऐसें विलक्षण । अद्भुत गहन । असे तीव्रपण । तेजाचें ह्या ॥६२१॥
वाटे सर्व सृष्टि । गेली बुडोनियां । महातेजाचिया । महार्णवीं ॥६२२॥
किंवा कल्पांतींच्या । विजांनीं संपूर्ण । टाकिलें गगन । झांकोनियां ॥६२३॥

---

१ ज्ञानदृष्टि.  २ मकराकृति तोंड असलेलें जें रथाचें जूं त्याच्या.  ३ काजव्याप्रमाणे.

प्रळयाग्नि-ज्वाळा । तोडोनियां साच । बांधिला कीं माच । अंतराळीं ।।६२४।।
दिव्य ज्ञान-दृष्टि । घेवोनि हि आतां । तेज हें अनंता । पाहवेना ।।६२५।।
तेज अनिवार । प्रखर दाहक । कैसें अधिकाधिक । [१] धडाडे हें ।।६२६।।
दिव्यचक्षूसी हि । पडतसे त्रास । न्याहाळावयास । प्रकाश हा ।।६२७।।
* काळाग्नि नामक । रुद्राचिया ठायीं । जो का नित्य राही । गूढपणें ।।६२८।।
ऐसा घोर महा-। प्रळयींचा [२] डोंब । उफाळोनि नभ । व्यापी जैसें ।।६२९।।
जणूं शंकराच्या । * तृतीय नेत्राची । उमलली साची । दिव्यकळी ।।६३०।।
तैसा पसरतां । प्रकाश आगळा । * पंचाग्नीच्या ज्वाळा । भडकोनि ।।६३१।।
तयांच्या वेढ्यांत । सांपडोनि देख । होत आहे राख । ब्रह्मांडाची ।।६३२।।
ऐसा तूं अद्भुत । दिव्य तेजोराशि । माझिया दृष्टीसी । [३] दृश्यमान ।।६३३।।
नवल हें तुझ्या । रूपाचें दर्शन । जन्मल्यापासोन । आज झालें ।।६३४।।
प्रभो तुझी व्याप्ति । [४] नि:सीम साचार । तेज हि अपार । तैसें तुझें ।।६३५।।

त्वमक्षरं परमं वेदितव्यं ।
त्वमस्य विश्वस्य परं निधानम् ।
त्वमव्यय: शाश्वतधर्मगोप्ता ।
सनातनस्त्वं पुरुषो मतो मे ।।१८।।

* ॐकाराच्या मात्रा । ज्या कीं साडेतीन । होसी तूं त्याहून । पलीकडे ।।६३६।।
देवा परब्रह्म । होसी तूं [५] अ-क्षर । [६] श्रुति तुझें घर । धुंडाळिती ।।६३७।।
सर्व विश्व जेथें । सांठविलें जाय । आकाराचा लय । होय जेथें ।।६३८।।
ऐसें जें अव्यय । अविनाशी स्थान । तें चि हें गहन । रूप तुझें ।।६३९।।
शाश्वत धर्मासी । एक तूं ओलावा । तूं चि नित्य नवा । स्वयं-सिद्ध ।।६४०।।
छत्तीस तत्त्वांच्या । पैलाड जो एक । तो चि अलौकिक । पुरुष तूं ।।६४१।।

अनादिमध्यान्तमनन्तवीर्य-
मनन्तबाहुं शशिसूर्यनेत्रम् ।
पश्यामि त्वां दीप्तहुताशवक्त्रं

---

* परिशिष्ट पहा. १ उसळतें. २ आगीचा लोळ. ३ दिसणारा. ४ अमर्याद. ५ अविनाशी. ६ वेद.

स्वतेजसा विश्वमिदं तपन्तम् ।।१९।।

श्रीहरी तूं आदि-। मध्यान्त रहित । अपार अ-च्युत । निज-बळें ।।६४२।।
सर्व हि बाजूंनीं । तुज हात पाय । तुझें रूप होय । सर्व-व्यापी ।।६४३।।
रवि-चंद्र-नेत्रीं । कोप-प्रसादाची । तूं चि [१]लीला साची । दाखविसी ।।६४४।।
कृपाकटाक्षें तूं । पाळिसी एकातें । [२]दण्डिसी एकातें । [३]कोपदृष्टी ।।६४५।।
ऐसें तुझें दिव्य । स्वरूप साचार । दृष्टीसी गोचर । झालें आज ।।६४६।।
पेटतां काळाग्नि । तेज फांके जैसें । तुझें मुख तैसें । दिसतसे ।।६४७।।
ज्वाळांचे अलोट । उसळती लोट । पेटतां पर्वत । [४]दावाग्नीनें ।।६४८।।
तैसी मुखामाजीं । दाढा आणि दांत । आवेशें चाटीत । जीभ लोळे ।।६४९।।
तुझिया सर्वांग-। कांतीचें प्रखर । होय अनिवार । तेज जें का ।।६५०।।
आणि मुखांतून । पडे जी बाहेर । उष्णता अपार । अति तीव्र ।।६५१।।
तेणें सर्व विश्व । होवोनि संतप्त । खवळोनि जात । एकाएकीं ।।६५२।।

द्यावापृथिव्योरिदमन्तरं हि
व्याप्तं त्वयैकेन दिशश्च सर्वाः ।
दृष्ट्वाऽद्भुतं रूपमुग्रं तवेदं
लोकत्रयं प्रव्यथितं महात्मन् ।।२०।।

आतां स्वर्ग-लोक । [५]मेदिनी पाताळ । आणि अंतराळ । दाही दिशा ।।६५३।।
क्षितिजादि सर्व । व्यापिलें त्वां एकें । कौतुकें हें देखें । येथें देवा ।।६५४।।
परी गगना हि । सकट सकळ । बुडावें विक्राळ-। रूपीं जैसें ।।६५५।।
ना तरी अद्भुत । रसाच्या कल्लोळीं । भुवनें वेढिलीं । *चवदा हि ।।६५६।।
तैसें तुझें रूप । अद्भुत सखोल । मज आकळेल । कैसें काय ? ।।६५७।।
साहवे ना ऐसी । तुझी उग्र कांति । आवरे ना व्याप्ति । असामान्य ।।६५८।।
२० सुख व्हावें हें तों । राहिलें बाजूस । परी जगायास । त्रास पडे ।।६५९।।
पाहोनि हें तुझें । स्वरूप अद्भुत । कैसें भयभीत । झालें विश्व ।।६६०।।
प्रभो, कैसें आतां । दुःख-लहरींत । बुडोनियां जात । त्रैलोक्य हें ।।६६१।।

---

*परिशिष्ट पहा.　१ खेळ.　२ शिक्षा करतोस.　३ क्रोधाच्या दृष्टीने.　४ वणव्यानें.　५ पृथ्वी.

विश्वरूपा तुझें । ऐश्वर्य-दर्शन । कां व्हावें कारण । भय-दु:खां ॥६६२॥
न होय तें कां गा । सुखासी कारण । आलें समजोन । मज आतां ॥६६३॥
जोंवरी दृष्टीसी । नव्हतें गोचर । श्रीहरी साचार । रूप तुझें ॥६६४॥
तोंवरी नश्वर । संसार-सुखांत । रंगोनियां जात । होतें विश्व ॥६६५॥
आतां तया आला । विषयांचा वीट । झाली तुझी भेट । म्हणोनियां ॥६६६॥
परी दृढ देऊं । येईल का मिठी । तुज जगजेठी । एकाएकीं ॥६६७॥
आणि तुज मिठी । दिधल्यावांचून । नोहे समाधान । कष्टी जीवा ॥६६८॥
मागें सरूं जावें । तरी [1] अनिवार । पाठीसी संसार । लागलासे ॥६६९॥
पुढें जावें तरी । तूं तों अनावर । न येसी साचार । घेऊं हातीं ॥६७०॥
[2] बापुडें त्रैलोक्य । जातसे पोळून । ऐसें सांपडून । [3] कचाटींत ॥६७१॥
जणूं तूं अग्नीच । प्रकटसी आज । उघड हें मज । वाटतसे ॥६७२॥
जैसा कोणी एक । पोळला आगींत । निवावया येत । सागरासी ॥६७३॥
तंव तेथें हि तो । घाबरे पाहून । तरंग भीषण । सागराचे ॥६७४॥
होय तळमळ । जगाची तैसी च । देखोनियां साच । तुझें रूप ॥६७५॥

अमी हि त्वां सुरसंघा विशन्ति ।
केचिद्भीता: प्राञ्जलयो गृणन्ति ।
स्वस्तीत्युक्त्वा महर्षिसिद्धसंघा:
स्तुवन्ति त्वां स्तुतिभि: पुष्कलाभि: ॥२१॥

तयामाजीं भले । ज्ञान-संपन्न हे । पलीकडे पाहें । सुर-संघ ॥६७६॥
सर्व हि कर्मांचीं । जाळूनियां बीजें । तुझ्या मूळ-तेजें । विश्व-रूपा ॥६७७॥
सद्भावाच्या बळें । तुझ्या चि रूपांत । मिळोनियां जात । स्वभावें ते ॥६७८॥
आणि कोणी एक । सहजें भिऊन । सर्वस्वीं धरून । तुझा पंथ ॥६७९॥
उभे तुजपुढें । जोडोनियां हात । प्रार्थना करीत । मनोभावें ॥६८०॥
प्रभो, अविद्येच्या । महा-सागरांत । गटंगळ्या खात । आहों आम्ही ॥६८१॥
विषयांच्या जाळ्या-। माजीं सांपडून । कैसे अडकून । गेलों येथें ॥६८२॥

---

१ दूर करतां येत नाहीं असा. २ बिचारें. ३ चिमट्यांत; अडचणींत.

अहं-ममत्वानें । होवोनियां [१] भ्रांत । स्वर्ग-संसारांत । सांकडलों ।।६८३।।
दीन-दयाघना । आतां तुजवीण । सोडवील कोण । आम्हांलागीं ।।६८४।।
तुज जीवेंभावें । येतसों शरण । ऐसी आळवण । करिती ते ।।६८५।।
महर्षि आणिक । सिद्ध विद्याधर–। समूह साचार । विविध हे ।।६८६।।
विश्वरूपा तुझें । इच्छुनी कल्याण । करिती स्तवन । नाना स्तोत्रीं ।।६८७।।

रुद्रादित्या वसवो ये च साध्या
विश्वेऽश्विनौ मरुतश्चोष्मपाश्च ।
गन्धर्वयक्षासुरसिद्धसंघा
वीक्षन्ते त्वां विस्मिताश्चैव सर्वे ।।२२।।

अकरा रुद्र आणि । बारा आदित्य हे । अष्ट वसू पाहें । साध्य देव ।।६८८।।
अश्विनीकुमार । मरुद्गण सर्व । आणि विश्वेदेव । सुसंपन्न ।।६८९।।
यक्ष-राक्षसांचे । समुदाय देख । पितर आणिक । गंधर्व हि ।।६९०।।
तेविं सिद्ध आणि । देव हि अनेक । जयांत प्रमुख । महेंद्र हा ।।६९१।।
आपुलाल्या लोकीं । राहोनि हे सर्व । उत्कंठेनें विश्व–। रूप तुझें ।।६९२।।
पाहतां पाहतां । क्षणोक्षणीं मनीं । थक्कित होवोनि । आश्चर्यानें ।।६९३।।
प्रभो तुजपुढें । आपुलीं मस्तकें । नमविती देखें । प्रेमादरें ।।६९४।।
जय जय [२] मंजु-घोष । करोनियां मग । गाजविती स्वर्ग । सर्व हि ते ।।६९५।।
आणि दोन्ही कर । जोडोनि बरवे । तुज भक्ति-भावें । वंदिती ते ।।६९६।।
तयांच्या [३] विनय–। वृक्षांच्या बागेंत । पातला वसंत । सात्त्विकांचा ।।६९७।।
म्हणोनियां तया । पालवी साचार । फुटोनियां [४] कर–। संपुटाची ।।६९८।।
तुझिया निर्मळ । स्वरूपाची भली । फल-प्राप्ति झाली । अनायासें ।।६९९।।

रूपं महत्ते बहुवक्त्रनेत्रं
महाबाहो बहुबाहूरुपादम् ।
बहूदरं बहुदंष्ट्राकरालं
दृष्ट्वा लोका: प्रव्यथितास्तथाहम् ।।२३।।

---

१ वेडे. २ मंजुळ आवाज. ३ नम्रतारूपी झाडांच्या. ४ जोडलेल्या हातांची.

वाटे देवांचिया । लोचनांचें दैव । आज अभिनव । उगवलें ॥७००॥
देखोनि हें तुझें । स्वरूप गहन । सुखाचा सुदिन । मनालागीं ॥७०१॥
कोठोनि पाहिलें । तरी हि सन्मुख । त्रैलोक्य-व्यापक । रूप तुझें ॥७०२॥
म्हणोनि देव हि । दचकले मनीं । थक्कित होवोनि । देखतां चि ॥७०३॥
एक चि तूं परी । मुखें भयानक । विचित्र अनेक । तुझीं देवा ॥७०४॥
नेत्र हि बहुत । आणि शस्त्र-युक्त । हस्त अगणित । तुझे देवा ॥७०५॥
असंख्यात मांड्या । उदरें चरण । नानाविध वर्ण । तुझे देवा ॥७०६॥
प्रत्येक तें मुख । भासे [१] बुभुक्षित । खावया उठत । जणूं सारें ॥७०७॥
महा-कल्पाचिया । अंतीं प्रळयाग्नि । येई उफाळोनि । चहूंकडे ॥७०८॥
तैसीं तुझीं घोर । मुखें अनिवार । भासती चौफेर । पसरलीं ॥७०९॥
नातरी * संहार-। रुद्राचीं उदंड । भासती प्रचंड । यंत्रें च तीं ॥७१०॥
भूत-भक्षणार्थ । युगान्तशक्तीचीं । जणूं ताटें साचीं । वाढिलीं तीं ॥७११॥
नातरी * प्रळय-। भैरवांचीं क्षेत्रें । तैसीं तुझीं [२] वक्त्रें । सर्वत्र हीं ॥७१२॥
न मावती सिंह । दरीमाजीं जैसे । भासती हे तैसे । उग्र दंत ॥७१३॥
नाचती उल्हासें । पिशाच्चें तीं दुष्ट । दाट अंधारांत । काळ-रात्रीं ॥७१४॥
तैशा मुखीं दाढा । भासती अपारें । कल्पान्त- [३] रुधिरें । माखल्या ज्या ॥७१५॥
काळानें च दिलें । युद्धाचें आव्हान । मातलें मरण । प्रळयान्तीं ॥७१६॥
तुझिया मुखांचें । भयानकपण । तैसें च दारुण । दिसतसे ॥७१७॥
आतां बापुड्या ह्या । लोकसृष्टीवर । फेंकिली नजर । [४] अळुमाळ ॥७१८॥
तंव दुःखरूप । [५] कालिंदीच्या तटीं । [६] पादपांची दाटी । तैसें भासे ॥७१९॥
तूं जो महामृत्यु-। रूपी महार्णव । तयामाजीं नाव । त्रैलोक्याची ॥७२०॥
सांपडोनि दुःख-। रूपी वादळांत । लाटांसवें होत । खालींवरी ॥७२१॥
तुज त्रि-लोकांशीं । काय असे काज । भोगीं तूं सहज । ध्यान-सुख ॥७२२॥
ऐसें एकाएकीं । कोपोनि श्रीहरी । म्हणशील जरी । मजलागीं ॥७२३॥
तरी लोकांचें तों । निमित्त हें साच । कांपती माझे च । प्राण येथें ॥७२४॥

---

१ वखवखलेले. २ तोंडें. ३ रक्तानें. ४ जराशी. ५ यमुनेच्या. ६ वृक्षांची.

ज्या मज पाहोनि । काळ-रुद्र [1] धापे । मृत्यु तो हि लपे । भिवोनियां ॥७२५॥
तो मी भयें येथें । कांपे चळाचळां । ऐसें श्रीगोपाळा । केलें तुवां ॥७२६॥
नवल हें नव्हे । का ही [2] महामारी । म्हणावें हें जरी । विश्वरूप ॥७२७॥
तरी भेसूरते–। माजीं तें साचार । पावविते हार । भयातें हि ॥७२८॥
महा-काळाशीं हि । खेळावया झुंज । क्रोधावेशें सज्ज । जाहलीं जीं ॥७२९॥

नभःस्पृशं दीप्तमनेकवर्णं
व्यात्ताननं दीप्तविशालनेत्रम् ।
दृष्ट्वा हि त्वां प्रव्यथितान्तरात्मा
धृतिं न विन्दामि शमं च विष्णो ॥२४॥

तया मुखांचा हा । वाढला विस्तार । अनंत अपार । नभाहूनि ॥७३०॥
त्रिलोकांचा वारा । जयां वेंटाळी ना । ऐसीं जीं गगना–। हूनि थोर ॥७३१॥
आपुल्या वाफांनीं । अग्नीसी जाळीत । कैसीं धडाडत । राहिलीं हीं ॥७३२॥
दिसती ना एका–। सारिखीं हीं एक । वर्ण हि अनेक । मुखांचे ह्या ॥७३३॥
ऐसीं महाघोर । फार सांगूं काय । होती जीं साहाय्य । काळाग्नीसी ॥७३४॥
एक एक मुख । ऐसें [3] दीप्तिमंत । जाळील क्षणांत । त्रैलोक्यासी ॥७३५॥
तया मुखांमाजीं । आणिक हि मुखें । दांत दाढा देखें । आणिक हि ॥७३६॥
जैसा वाऱ्यानें च । वारा चाळवावा । सागरासी यावा । महा-पूर ॥७३७॥
वडवाग्निमाजीं । नातरी साचार । पडावी ती भर । विषाग्नीची ॥७३८॥
किंवा हालाहलें । [4] पावकासी प्यावें । मृत्यूसी भेटावें । मृत्यूनें च ॥७३९॥
तैसें हें संहार–। तेज अनिवार । मातलें साचार । मुखामाजीं ॥७४०॥
आणि मुखें तीं हि । केवढीं विस्तीर्ण । तुटोनि गगन । पडे जैसें ॥७४१॥
किंवा नभासी च । सर्व हि बाजूंनीं । जणूं कवळोनि । राहिलीं तीं ॥७४२॥
ना तरी [5] धरित्री । घालोनि काखेंत । शिरे [6] विवरांत । * हिराण्याक्ष ॥७४३॥
पाताळापर्यंत । होतें जें विस्तृत । * हाटकेश्वरांत । उघडलें ॥७४४॥
तैसा मुखांचा हा । अफाट विस्तार । जिव्हांचा हि जोर । आगळा चि ॥७४५॥

---

* परिशिष्ट पहा. १ घाबरतो. २ प्राणसंकट. ३ तेजस्वी. ४ अग्नीला. ५ पृथ्वी. ६ भुयारांत.

विश्व एका घांसा । अपुरें म्हणोन । नातरी गिळोन । टाकिता तें ॥७४६॥
पाताळींचे नाग । फुत्कारतां जैशा । झोंबती आकाशा । विष-ज्वाळा ॥७४७॥
तैशा पसरल्या । जिव्हा खालींवरी । मुखाचिया दरी–। माजीं येथें ॥७४८॥
कल्पांत-विजांचें । बांधोनि [१]जुंबाड । आकाशींचे गड । शृंगारावे ॥७४९॥
तैसीं धगधगीत । दाढांचीं हीं टोंकें । विराजती देखें । ओष्ठ-प्रांतीं ॥७५०॥
आणि [२]ललाटींच्या । [२]खोळेमाजीं दृष्टि । भयातें हि भीति । दाविते जी ॥७५१॥
जणूं [३]भ्रू-तळीं ती । राहिली लपून । उसळी भयाण । मृत्यूची च ॥७५२॥
ऐसें उग्र रूप । घेवोनियां येथें । काय साधायातें । पाहतोसी ॥७५३॥
नेणें चि हें कांहीं । ओढवलें परी । आज मजवरी । मृत्यू-भय ॥७५४॥
देवा विश्वरूप । पहायाची आस । केली ती फळास । आली ऐसी ॥७५५॥
पाहोनि हें रूप । देवा चांगले च । शांत झाले साच । माझे डोळे ! ॥७५६॥
[४]पार्थिव हा देह । नासेल निभ्रांत । कोण काकुळत । करी त्याची ॥७५७॥
परी आतां माझ्या । चैतन्याची येथ । नाहीं धडगत । ऐसें वाटे ॥७५८॥
सर्वांग हें देख । भयें कैसें कांपे । अतिरेकें तापे । मन तें हि ॥७५९॥
दचकली बुद्धि । रूप हें पाहून । गेला अभिमान । गळोनियां ॥७६०॥
परी अंतरात्मा । आनंद-स्वरूप । तो हि जणूं कंप । पावतसे ! ॥७६१॥
तुझें विश्वरूप । पहावें ह्या डोळां । छंद हा आगळा । घेतला मीं ॥७६२॥
परी तेणें कैसें । झालें विपरीत । [५]देशोधडी जात । ज्ञान माझें ॥७६३॥
ऐसा गुरु-शिष्य–। संबंध आगळा । असेल विरळा । ऐसें वाटे ! ॥७६४॥
तुझें विश्वरूप । पाहोनि अद्भुत । व्याकुळलें चित्त । माझें देवा ॥७६५॥
तया सांवराया । धैर्य आणूं पाहें । तंव गेलें आहे । आधीं च तें ॥७६६॥
त्या हि वरी विश्व–। रूप देखतां च । घाबरलों साच । त्याहुनी हि ॥७६७॥
विश्वरूपीं मज । ऐसें गोंविलेंस । भला उपदेश । तुझा देवा ! ॥७६८॥
पूर्ण विश्रांतीची । धरोनियां हांव । धडपडे जीव । बापुडा हा ॥७६९॥
परी तुझ्या उग्र । रूपीं जनार्दना । आसरा दिसेना । कोठें हि तो ॥७७०॥

---

१ जुडगा. २ कपाळाच्या खोबणींत. ३ भुवयांखालीं. ४ जड. ५ दूर पळालें.

विश्वरूपाचिया । महामारीमाजीं । [1] सांकडलें आजि । चराचर ।।७७१।।
तरी करूं काय । कैसा राहूं स्वस्थ । न सांगूं हें येथ । जरी तुज ।।७७२।।

दंष्ट्राकरालानि च ते मुखानि
दृष्ट्वैव कालानलसन्निभानि ।
दिशो न जाने न लभे च शर्म
प्रसीद देवेश जगन्निवास ।।२५।।

जणूं काळाचें च । फुटोनियां भांडें । उडावे तुकडे । चोहींकडे ।।७७३।।
अक्राळविक्राळ । तैसीं तुझीं मुखें । पसरलीं देखें । निरंतर ।।७७४।।
तयांमाजीं दांत–। दाढांची ती दाटी । कैसी दोन्ही ओठीं । सामावे ना ।।७७५।।
प्रळय-शस्त्रांचें । जणूं विलक्षण । घातलें कुंपण । ऐसें वाटे ।।७७६।।
[2] तक्षकाच्या तोंडीं । भरावें [3] जहर । पिशाच्चसंचार । काळरात्रीं ।।७७७।।
किंवा वज्राग्नीनें । अघोर आवेशें । परजावें जैसें । [4] पावकास्त्र ।।७७८।।
तैसीं तुझीं तोंडें । भासती प्रचंड । जेथोनि उदंड । त्वेष वाहे ।।७७९।।
आम्हांवरी लोंढे । मृत्युरसाचे च । ओढवले साच । ऐसें वाटे ।।७८०।।
कल्पान्तींचा वायु । आणि प्रळयाग्नि । दोन्ही हि मिळोनि । येती जेव्हां ।।७८१।।
तेव्हां काय एक । जळायाचें राहे । दग्ध होत आहे । विश्व सारें ।।७८२।।
तैसीं संहारक । मुखें अनिवार । देखोनियां धीर । गळे माझा ।।७८३।।
दिसती ना दिशा । गेलों मी भुलोन । नाठवे मी कोण । तें हि आतां ।।७८४।।
तुझें विश्वरूप । देखिलें [5] अळुमाळ । सुखाचा दुष्काळ । तों चि झाला ।।७८५।।
आतां अस्ताव्यस्त । आवरीं आवरीं । आपुलें श्रीहरी । विश्वरूप ।।७८६।।
ऐसें भयानक । दाविशील कांहीं । स्वप्नांत हि नाहीं । कल्पिलें हें ।।७८७।।
एऱ्हवीं हें रूप । दाखवा म्हणोन । हट्ट घेता कोण । तुजपाशीं ।।७८८।।
आतां ह्या स्वरूप–। प्रळयापासून । वांचवी हे प्राण । एक वेळ ।।७८९।।
आमुचा तूं धनी । प्रभो चक्र-पाणी । तुज विनवणी । एवढी च ।।७९०।।
आतां विश्वरूप–। महामारींतून । बाहेरी काढोन । मजलागीं ।।७९१।।

---

१ चेंगरलें. २ एका जातीचा सर्प. ३ विष. ४ जाळून खाक करणारें अस्त्र. ५ किंचित्, थोडेंसें.

श्रीहरी सत्वर । वांचवी [१] दातारा । पसारा हा सारा । आवरोनि ।।७९२।।
देवदेवा विश्व–। जीवन तूं होसी । आधार विश्वासी । तूं चि एक ।।७९३।।
परी कैसा करूं । पाहसी साचार । तयाचा संहार । आज येथें ।।७९४।।
आपुली ही माया । घेईं आवरून । होवोनि प्रसन्न । देवराया ।।७९५।।
आतां महा-भया–। पासोनि श्रीहरी । त्वरें मुक्त करीं । मजलागीं ।।७९६।।
येथें तुजप्रति । देवा ऐशा रीती । यावें काकुळती । वारंवार ।।७९७।।
घोर विश्व-रूप । तुझें हें देखून । एवढा भिऊन । गेलों आज ।।७९८।।
येतां इंद्र-पुर । जिंकाया दानव । केला पराभव । तयांचा मीं ।।७९९।।
काळाचें हि भय । वाटेना अंतरीं । जरी तो सामोरीं । उभा ठाके ।।८००।।
परी हें तों नव्हे । तैसें साधारण । काळावरी ताण । झाली येथें ।।८०१।।
तुझें विश्वरूप । घेऊं पाहे घोंट । आमुच्यासकट । विश्वाचा हि ।।८०२।।
देवा नसतां ही । प्रळयाची वेळ । मध्येंच तूं काळ । [२] पातलासी ।।८०३।।
बापुडें त्रैलोक्य । अल्पायुषी झालें । रूप हें थोरलें । देखतां चि ।।८०४।।
हाय ! हाय !! कैसें । भाग्य विपरीत । विघ्न [३] अवचित । पातलें हें ।।८०५।।
तुझे विश्व-रूप । देखोनियां शांत । व्हावें ऐसा [४] हेत । मनीं होता ।।८०६।।
परी येथें कैसा । अरेरे ! तूं ग्रास । करूं लागलास । विश्वाचा ह्या ।।८०७।।
चार हि बाजूंनीं । व्यापोनि ही सेना । आपुल्या वदना–। माजीं घेसी ।।८०८।।
तुझ्या विश्वरूपीं । येथें भगवंता । प्रत्यक्ष हें आतां । देखतसें ।।८०९।।

अमी च त्वां धृतराष्ट्रस्य पुत्राः
सर्वे सहैवावनिपालसंघैः ।
भीष्मो द्रोणः सूतपुत्रस्तथासौ
सहास्मदीयैरपि योधमुख्यैः ।।२६।।

अंध धृतराष्ट्र । तयाचे कुमर । नव्हेत का वीर । कौरव हे ।।८१०।।
तुझ्या मुखामाजीं । सर्व हे साचार । सह परिवार । गेले गेले ! ।।८११।।
आणि सहाय्यार्थ । देशोदेशींचे जे । राजे महाराजे । आले येथें ।।८१२।।

---

१ कृपावंता; उदारा.　२ येऊन पोहोचलास.　३ अकस्मात्.　४ हेतु: इच्छा.

तयांची तों वार्ता । काय झाली तें हि । सांगावया नाहीं । कोणी मागें ।।८१३।।
सर्वांलागीं ऐसें । मुखीं रगडून । टाकिसी गिळून । एकाएकीं ।।८१४।।
गज-समूहातें । घटघटां घेसी । मुखीं कवळिसी । सर्व सेना ।।८१५।।
गोलंदाज आणि । [१]पादचारी वीर । लोपती अपार । मुखांमाजीं ।।८१६।।
एक एक शस्त्र । ऐसें महा-घोर । जणूं [२]सहोदर । काळाचें चि ।।८१७।।
जें का एकलें च । पुरेल साचार । विश्वाचा संहार । करावया ।।८१८।।
ऐसीं संहारक । शस्त्रें असंख्यात । आवेशें गिळीत । आहेसी तूं ।।८१९।।
चतुरंग सेना । [३]स-तुरंग रथ । न लावितां दांत । गिळितोसी ।।८२०।।
गिळावया सर्वां । कैसा तुज देवा । संतोष बरवा । वाटतसे ।।८२१।।
भीष्माचार्यांऐसा । सत्यवादी कोण । संग्रामीं निपुण । दुजा थोर ।।८२२।।
हाय ! तयासी हि । टाकिसी गिळून । आणि गुरु द्रोण । ब्राह्मण हि ।।८२३।।
अरेरे ! हा देखें । सूर्याचा नंदन । गेला गेला कर्ण । महा-वीर ! ।।८२४।।
आमुची हि सेना । कस्पटासमान । आघवी झाडोन । टाकिलीस ।।८२५।।
हाय ! ब्रह्मदेवा । अनुग्रहें येथ । ऐसें विपरीत । प्राप्त झालें ! ।।८२६।।
बापुड्या जगासी । आणिलें मरण । प्रभूसी प्रार्थून । ऐशा रीती ।।८२७।।
देवें जगन्नाथें । मागें थोडाफार । विभूति-प्रकार । निवेदिला ।।८२८।।
परी व्यापकता । तैसी नये चित्ता । म्हणोनि मागुता । पुसों गेलों ।।८२९।।
होणार जें जैसें । बुद्धि हि तैसी च । [४]भोक्तव्य तें साच । टाळवे ना ।।८३०।।
माझिया कपाळीं । सर्वांनीं साचार । फोडावें खापर । अनर्थाचें ।।८३१।।
[५]विधि-लिखित हें । ऐसें जरी असे । तरी कोणा कैसें । टाळवेल ।।८३२।।
मंथितां सागर । लाधलें अमृत । तरी देव स्वस्थ । राहती ना ।।८३३।।
मग पुनरपि । घुसळितां अंतीं । आलें तयांहातीं । काळकूट ।।८३४।।
परी तें संकट । एकेपरी अल्प । प्रत्ययाचें माप । घेतां वाटे ।।८३५।।
आणि तयाचा हि । परिहार करी । तिये अवसरीं । नील-कंठ ।।८३६।।
परी हा प्रसंग । कैसा विलक्षण । त्याहुनी भीषण । वाटे मज ।।८३७।।

---

१ पायांनी चालून (लढणारे), (पायदळातील सैनिक). २ भावंड. ३ घोड्यांसह.
४ भोगावयाचें. ५ लटाटरेषा.

गिळील का कोण । विषाचें गगन । पेटता पवन । आवरील ॥८३८॥
महा-काळासंगें । मांडावया खेळ । असे काय बळ । कोणाअंगीं ? ॥८३९॥
ऐसा तो किरीटी । होवोनियां कष्टी । आपुलिया चित्तीं । करी शोक ॥८४०॥
परी तयालागीं । कळे ना [१] प्रस्तुत । काय मनोगत । श्रीहरीचें ॥८४१॥
ग्रासिला तो देखा । ऐशा महा-मोहें । [२] वध्य कौरव हे । [३] वधिता मी ॥८४२॥
तयाचा हा मोह । करावया दूर । दाविलें साचार । विश्वरूप ॥८४३॥
विश्वरूपाचें तों । करोनि निमित्त । तत्त्व हें चि व्यक्त । केलें देवें ॥८४४॥
अरे येथें कोणी । कोणातें न मारी । सर्व हें संहारी । मी चि एक ॥८४५॥
परी प्रभूचा हा । गूढ [४] अभिप्राय । नेणे धनंजय । म्हणोनियां ॥८४६॥
कंप पावे वायां । व्याकुळोनि चित्तीं । नसती च भीति । वाढवोनि ॥८४७॥

वक्त्राणि ते त्वरमाणा विशन्ति
दंष्ट्राकरालानि भयानकानि ।
केचिद्विलग्ना दशनान्तरेषु
संदृश्यन्ते चूर्णितैरुत्तमाङ्गैः ॥२७॥

मग म्हणे देख । अभ्रें जैशा रीती । जिरोनियां जाती । आकाशांत ॥८४८॥
दोन्ही दळें तैसीं । शस्त्रास्त्रांसहित । तुझिया मुखांत । गेलीं गेलीं ! ॥८४९॥
किंवा देख महा–। कल्पाचिया अंतीं । कोपतां च सृष्टी–। वरी काळ ॥८५०॥
पाताळासकट । करीतसे ग्रास । जैसा एकवीस । स्वर्गांचा हि ॥८५१॥
प्रतिकूल दैवें । * कृपणाचे ठेवे । ठायीं च स्वभावें । लया जाती ॥८५२॥
तैसीं साठवलीं । देख एकाएकीं । प्रवेशलीं मुखीं । सर्व सैन्यें ॥८५३॥
परी तोंडांतून । सुटे ना कोणी च । [५] कर्म-गति साच । विलक्षण ॥८५४॥
चघळावे उंटें । अशोकाचे [६] टाळे । तैसे मुखीं गेले । वायां लोक ॥८५५॥
मुकुटांसहित । मस्तकें हीं येथ । कैसीं चिमट्यांत । सांपडलीं ॥८५६॥
जणूं रगडोनि । तयांचें तों कैसें । पीठ झालें दिसे । दाढांमाजीं ॥८५७॥
मुकुटांवरील । हिरे-माणिकें हि । अडकलीं कांहीं । तीक्ष्ण दंतीं ॥८५८॥

---

१ आतां. २ ठार मारण्यायोग्य. ३ ठार मारणारा. ४ आशय. ५ नशिबाचा फेरा. ६ डहाळ्या.

तया माणिकांचा । होवोनियां चुरा । पसरला सारा । जिव्हेखालीं ।।८५९।।
दातांचे हि कांहीं । कांहीं अग्रभाग । ते हि गेले चांग । माखोनियां ।।८६०।।
विश्वरूप-काळें । टाकिलें ग्रासोन । बळ हि संपूर्ण । लोकांचें ह्या ।।८६१।।
परी तयांचें जें । असे [१] उत्तमांग । अवश्य अभंग । ठेविलें तें ।।८६२।।
शरीरामाझारीं । मस्तकें हीं देख । सुनिश्चयें चोख । होती साच ।।८६३।।
म्हणोनियां महा-। काळाच्या हि तोंडीं । तयांची राखोंडी । नाहीं झाली ।।८६४।।
मग पार्थ म्हणे । नवल हें पाहीं । दुजी गति नाहीं । भूतांसी ह्या ।।८६५।।
म्हणोनि हें जग । मुखरूपी डोहीं । बुडोनियां जाई । आपोआप ।।८६६।।
कैशा स्वभावें च । सर्व हि ह्या सृष्टि । प्रवेशती अंतीं । मुखामाजीं ।।८६७।।
हें तों विश्वरूप । राहोनियां स्वस्थ । गिळीतसे येथ । आघवें हि ।।८६८।।
उंच मुखामाजीं । धांवती साचार । समस्त ही थोर । ब्रह्मादिक ।।८६९।।
विश्वरूपाचिया । पडती वदनीं । ऐलीकडे कोणी । सामान्य हे ।।८७०।।
जन्मल्या ठायीं च । गिळोनी टाकीत । कैसें भूतजात । आणिक हि ।।८७१।।
तुझिया [२] आनना-। पासोनियां येथ । सुटेना निभ्रांत । कांहीं एक ।।८७२।।

यथा नदीनां बहवोऽम्बुवेगा:
समुद्रमेवाभिमुखा द्रवन्ति ।
तथा तवामी नरलोकवीरा
विशन्ति वक्त्राण्यभिविज्वलन्ति ।।२८।।

महा-नदांचे ते । ओघ जैशा रीती । जावोनि मिळती । सागरातें ।।८७३।।
तैसें सारें जग । सर्व हि बाजूंनीं । तुझिया वदनीं । शिरताहे ।।८७४।।
दिन-रजनीचीं । करोनियां [३] पेणीं । पंथ आक्रमोनि । आयुष्याचा ।।८७५।।
[४] जाहलें [४] प्रविष्ट । तुझिया मुखांत । वेगें भूतजात । आघवें हें ।।८७६।।

यथा प्रदीप्तं ज्वलनं पतङ्गा
विशन्ति नाशाय समृध्दवेगा: ।
तथैव नाशाय विशन्ति लोका

---

१ मस्तक; डोकें. २ मुखापासून. ३ मुक्कामाच्या जागा. ४ शिरून राहिले.

स्तवापि वक्त्राणि समृद्धवेगाः ॥२९॥

लोटती पतंग । पेटत्या दरींत । तैसें भूतजात । तुझ्या मुखीं ॥८७७॥
तप्त लोहावरी । पडतां चि तोय । आटोनियां जाय । क्षणामाजीं ॥८७८॥
तैसें तुझ्या मुखीं । लोटलें जें कांहीं । तयाचें नांव हि । राहिलें ना ॥८७९॥

लेलिह्यसे ग्रसमानः समन्ता–
ल्लोकान्समग्रान्वदनैर्ज्वलद्‌भिः ।
तेजोभिरापूर्य जगत्समग्रं
भासस्तवोग्राः प्रतपन्ति विष्णो ॥३०॥

आणि एवढें हि । करोनि भक्षण । नाहीं उणेपण । भुकेलागीं ॥८८०॥
ऐसा [१] लोकोत्तर । [२] जठराग्नि येथ । [३] जाहला [३] प्रदीप्त । तुझा देवा ॥८८१॥
दोषी-ज्वरांतून । वाटावतां रोगी । उठे तयालागीं । खा खा जैसी ॥८८२॥
ना तरी [४] भणंग । हिंडे वणवण । जैसा सांपडोन । दुष्काळांत ॥८८३॥
तैसी तुझी देवा । वळवळे जिव्हा । चाटितां बरवा । ओष्ठप्रांत ॥८८४॥
तुझिया वदना–। पासोनियां साच । सुटलें नाहीं च । कांहीं एक ॥८८५॥
श्रीहरी प्रखर । ऐसी तुझी भूक । मज अलौकिक । वाटतसे ॥८८६॥
एका घोंटीं पोटीं । घ्यावें सागरास । करावा कीं घास । पर्वताचा ॥८८७॥
किंवा ब्रह्मगोल । गिळावा संपूर्ण । त्वरें रगडून । दाढेखालीं ॥८८८॥
ना तरी टाकाव्या । चांदिण्या चाटोन । दिशांतें घालोन । घशाखालीं ॥८८९॥
तुझिया भुकेची । ऐसी वखवख । दिसे स्वाभाविक । विश्वरूपा ॥८९०॥
जैसी [५] कामासक्ति । वाढत चि जाय । भोगावे विषय । जों जों येथें ॥८९१॥
किंवा अग्निमाजीं । घालितां सर्पण । जाय भडकोन । वेगें जैसा ॥८९२॥
देवा, तुझी भूक । वाढूं लागे तैसी । जों जों खाणें खासी । ब्रह्मांडाचें ॥८९३॥
वडवानलास । द्यावा गिळायास । जैसा एक घांस । कवठाचा ॥८९४॥
टेंकलें जिव्हाग्रीं । तैसें त्रिभुवन । तुझिया विस्तीर्ण । मुखामाजीं ॥८९५॥
पुरे ना त्रैलोक्य । एका मुखासी च । ऐसीं मुखें साच । असंख्यात ॥८९६॥

---

१ विलक्षण. २ पोटांतील अग्नि; पचनशक्ति. ३ पेटला. ४ भिकारी; दरिद्री. ५ विषयलोलुपता.

तरी त्रिभुवनें । एवढीं कोठून । आणावीं भक्षण । करावया ।।८९७।।
न मिळे आहार । तरी मुखें ऐसीं । कां गा वाढविसी । देवराया ।।८९८।।
लागोनि वणवा । पेटतां पर्वत । सांपडती त्यांत । पशू जैसे ।।८९९।।
तैसें बापुडें हें । पोळे त्रिभुवन । तुझिया [1] वदन–। ज्वाळेमाजीं ।।९००।।
नोहे नोहे विश्व–। रूपाची ही प्राप्ति । कैसी कर्म-गति । ओढवली ।।९०१।।
[2] जग-जळचरां । [3] कृतांताचें जाळें । जणूं पसरलें । ऐसें वाटे ।।९०२।।
अंग-प्रभेचिया । ऐशा जाळ्यांतून । सुटावें कोठून । जगें आतां ।।९०३।।
नव्हेत हीं मुखें । जणूं * लाक्षा-गृहें । ओढवलीं पाहें । जगालागीं ।।९०४।।
आपुलिया तेजें । कैसा पोळे प्राणी । हें तों काय अग्नि । जाणतसे ।।९०५।।
परी प्राणियासी । होतां अग्नि-स्पर्श । जळोनियां नाश । होय त्याचा ।।९०६।।
किंवा शस्त्र नेणे । निज-तीक्ष्णपण । प्राण्यासी मरण । कैसें आणी ।।९०७।।
ना तरी [4] जहर । निज-मारकता । सहजें सर्वथा । नेणे जैसें ।।९०८।।
तैसें आपुलिया । उग्रतेचें कांहीं । राहिलें च नाहीं । भान तुज ।।९०९।।
परी तुझ्या मुखीं । ऐलीकडे पाहें । होळी होत आहे । ब्रह्मांडाची ।।९१०।।
विश्व-व्यापक तूं । परमात्मा एक । तरी कां मारक । होसी आम्हां ।।९११।।
मज तों नाहीं च । जीवित्वाची चाड । नको धरूं भीड । तूं हि आतां ।।९१२।।
असेल जें कांहीं । प्रभो तुझ्या मनीं । उघड बोलोनि । दाखवीं तें ।।९१३।।
किती वाढविसीं । उग्र रूप आतां । प्रभो जगन्नाथा । विश्व-पाळा ।।९१४।।
मजवरी तरी । कृपा करीं पूर्ण । निज प्रभुपण । आठवोनि ।।९१५।।

आख्याहि मे को भवानुग्ररूपो
नमोऽस्तु ते देववर प्रसीद ।
विज्ञातुमिच्छामि भवन्तमाद्यं
न हि प्रजानामि तव प्रवृत्तिम् ।।३१।।

त्रैलोक्याचें मूळ–। कारण तूं होसी । वेद्य तूं वेदांसी । पद्मनाभा ।।९१६।।
विश्वासी तूं वंद्य । होसी चक्र-पाणी । ऐक विनवणी । एक वेळ ।।९१७।।

---

१ मुखरूपी ज्वाळेंत. २ जगरूपी माशांना. ३ काळाचें; यमाचें. ४ विष.

बोलोनियां ऐसें । करी नमस्कार । लववोनि शिर । [1] पाद-पदमीं ॥९१८॥
मग म्हणे पार्थ । प्रभो हृषीकेशी । माझिया बोलासी । चित्त द्यावें ॥९१९॥
पुसिलें मीं तुज । विश्वरूप-ध्यान । व्हावें समाधान । म्हणोनियां ॥९२०॥
तों चि एकाएकीं । रूप हें धरोन । कैसें त्रिभुवन । गिळितोसी ॥९२१॥
तरी तूं गा कोण । उग्र मुखें ऐसीं । कां गा मेळविसी । असंख्यात ॥९२२॥
सर्व हि हातांत । ऐसीं शस्त्रें तीक्ष्ण । कां गा परजोन । राहिलासी ॥९२३॥
जेव्हां तेव्हां क्रोधें । डोळे वटारून । विशाल होऊन । नभाहूनि ॥९२४॥
जगालागीं भय । दावोनियां देवा । [2] करिसी कां हेवा । [2] कृतांताशीं ॥९२५॥

श्रीभगवानुवाच–
कालोऽस्मि लोकक्षयकृत्प्रवृद्धो ।
लोकान्समाहर्तुमिह प्रवृत्तः ॥
ऋतेऽपि त्वां न भविष्यन्ति सर्वे ।
येऽवस्थिताः प्रत्यनीकेषु योधाः ॥३२॥

ऐकोनि हे बोल । म्हणे नारायण । कोण मी म्हणोन । विचारीसी ॥९२६॥
आणि कासयासी । ऐसा भयंकर । वाढवीं विस्तार । आपुला मी ॥९२७॥
तरी मी तों काळ । वाढलों साचार । लोकांचा संहार । करावया ! ॥९२८॥
आतां असंख्यात । मुखें पसरून । आघवें गिळीन । त्रैलोक्य हें ॥९२९॥
पार्थ म्हणे तेथ । मागील संकटा । त्रासोनि अनंता । प्रार्थिलें मीं ॥९३०॥
परी तोषला हा । कैसा [3] विपरीत । जाय वाढवीत । उग्र-रूप ! ॥९३१॥
ऐकोनि आपुले । कठोर हे बोल । निराश होईल । दुःखी पार्थ ॥९३२॥
जाणोनि हें मग । देव म्हणे तया । नको धनंजया । भिऊं येथें ॥९३३॥
ऐशा ह्या संहार–। संकटाची झळ । तुम्हां न लागेल । पांडवांसी ॥९३४॥
ऐकोनियां पार्थें । ऐसें आश्वासन । जातां जातां प्राण । सांवरले ॥९३५॥
सांपडला पार्थ । काळ-संकटांत । परी केला मुक्त । नारायणें ॥९३६॥
म्हणोनि सावध । होवोनि त्वरित । देवोनियां चित्त । ऐकूं लागे ॥९३७॥

---

१ चरणकमळांवर; पायांवर.  २ काळाबरोबर चढाओढ करतोस.  ३ उफराटा.

तों चि देव म्हणे । तुम्ही माझे भक्त । म्हणोनियां मुक्त । केलें तुम्हां ॥९३८॥
परी हा इतर । सर्व [१] दळ-भार । गिळाया साचार । प्रवर्तलों ॥९३९॥
काळाग्नींत जैसी । लोणियाची उंडी । तैसें माझ्या तोंडीं । गेलें विश्व ॥९४०॥
देखिलें तूं जें हें । सर्वथा तें साच । [२] वल्गना वायां च । वीरांच्या ह्या ॥९४१॥
[३] कुंथती हे वीर । शौर्याचिया बळें । जमवोनि मेळे । सैनिकांचे ॥९४२॥
निज-गज-दळां । वाखणिती किती । तुच्छसा लेखिती । काळातें हि ॥९४३॥
बोलती गर्जोन । वाहोनियां आण । रणीं हरूं प्राण । मृत्यूचे हि ॥९४४॥
सृष्टीवर सृष्टि । रचूं आम्ही थेट । जगाचा हि घोट । घेऊं आतां ॥९४५॥
गिळोनियां टाकूं । मेदिनी सकळ । जाळूं [४] अंतराळ । वरतीं च ॥९४६॥
जागच्या जागीं च । टाकूं जखडून । सोडोनियां बाण । वायूतें हि ॥९४७॥
चतुरंग-दळ । ऐसें जमवोन । उन्मत्त होवोन । अंग-बळें ॥९४८॥
महाकाळाशीं हि । खेळावया झुंज । सिद्ध झाले आज । रणीं येथें ॥९४९॥
तयांचे ते बोल । शस्त्रांहुनी तीक्ष्ण । अग्नीहुनी उष्ण । दाहकारी ॥९५०॥
काळकूटासी हि । आणितील हार । मारक अघोर । ऐसे जरी ॥९५१॥
तरी हे * गंधर्व–। नगरींचे लोट । तैसे फोलकट । वीर सारे ॥९५२॥
किंवा चित्रांतील । बहुरंगी फळें । जाण हें [५] भेंडोळें । पोकळीचें ॥९५३॥
मृगजळा आला । पूर कीं अमाप । केला जणूं साप । कापडाचा ॥९५४॥
किंवा चढवोनि । नाना अलंकार । मांडिलीं साचार । बाहुलीं हीं ॥९५५॥

तस्मात्त्वमुत्तिष्ठ यशो लभस्व
जित्वा शत्रून्भुङ्क्ष्व राज्यं समृद्धम् ।
मयैवैते निहताः पूर्वमेव
निमित्तमात्रं भव सव्यसाचिन् ॥३३॥

सकळ ही सेना । करी चळवळ । परी तिचें बळ । ग्रासिलें मीं ॥९५६॥
आतां ऐसें जाण । मृत्तिकेचीं साच । जणूं बाहुलीं च । निर्जीव हीं ॥९५७॥
थांबतसे जैसा । बाहुल्यांचा नाच । तुटोनि जातां च । कळ-सूत्र ॥९५८॥

---

१ सैन्यसमुदाय. २ बढाया. ३ गुरगुरत आहेत. ४ आकाश. ५ वळकटी; बोचकें.

मग तयालागीं । कोणी हि लोटून । देतां उलथून । पडती तीं ॥९५९॥
तैसा वीरांचा ह्या । कराया संहार । नको तुज फार । वेळ आतां ॥९६०॥
जाणोनि हें पार्था । होईं तूं शहाणा । घेईं धर्नुबाणा । ऊठ वेगें ॥९६१॥
मागें कौरव हे । * विराटाच्या गाई । हरावया पाहीं । आले जेव्हां ॥९६२॥
तेव्हां तेथींचा तो । विराट-कुमर । नामें जो * 'उत्तर' । [१] महा-भीरु ॥९६३॥
तयाहातीं रणीं । नागविलें सर्वां । घालोनियां तुवां । मोहनास्त्र ॥९६४॥
आतां त्याहूनी हि । बळ-हीन सेना । आयती च रणा । पातली ही ॥९६५॥
तरी सेनेचा ह्या । करोनि संहार । अर्जुना अपार । कीर्ति जोडीं ॥९६६॥
पार्थें एकल्यानें । जिंकिलें शत्रूंस । लोकीं ऐसें यश । मेळवीं गा ॥९६७॥
जाण कोरडें च । यश नव्हे येथ । राज्य हि समस्त । हातीं आलें ॥९६८॥
म्हणोनि तूं आतां । निमित्ताचा धनी । होवोनियां रणीं । झुंज वेगें ॥८६९॥

द्रोणं च भीष्मं च जयद्रथं च
कर्णं तथान्यानपि योधवीरान् ।
मया हतांस्त्वं जहि मा व्यथिष्ठा
युध्यस्व जेतासि रणे सपत्नान् ॥३४॥

नको बाळगूं च । द्रोणाची तूं [२] क्षिती । नको धरूं भीति । भीष्माची हि ॥९७०॥
चालवूं हें शस्त्र । कर्णावरी कैसें । नको मनीं ऐसें । आणूं कांहीं ॥९७१॥
जयद्रथालागीं । वधावया पाहीं । उपाय तो कांहीं । चिंतूं नको ॥९७२॥
आणिक हि जे जे । वीर [३] नामांकित । सिंह ते समस्त । चित्रांतील ॥९७३॥
जणूं ओल्या हातें । टाकावे पुसून । तैशा परी जाण । निर्जीव ते ॥९७४॥
सेना-समूहाचा । घेतला मीं ग्रास । राहिला [४] आभास । मात्र येथें ॥९७५॥
झुंजार हे वीर । माझ्या मुखीं गेले । ऐसें त्वां देखिलें । पार्था जेव्हां ॥९७६॥
तेव्हां चि ते झाले । निर्जीव सकळ । सोपटें पोकळ । तैसे आतां ॥९७७॥
तरी ऊठ वेगें । घेईं धनुर्बाण । करावया रण । ह्यांच्या संगें ॥९७८॥
आंतून हे मीं च । मारिले सकळ । वधीं तूं केवळ । बाहेरून ॥९७९॥

---

१ अति भित्रा.　२ पर्वा.　३ प्रसिद्ध; विख्यात.　४ मायिक देखावा.

आतां लटक्या च । शोक-संकटांत । नको पडूं भ्रांत । होवोनियां ।।९८०।।
लावोनियां खूण । मारितों [1] निशाण । कौतुकें आपण । जैशा रीती ।।९८१।।
घेवोनियां ध्यानीं । ईश्वरी संकेत । तैसा रणीं येथ । झुंज आतां ।।९८२।।
तुझ्या वैरियांस । गिळिलें नि:शेष । राज्यासह यश । भोगीं पार्था ।।९८३।।
तुझे भाऊबंद । झाले होते धुंद । चढोनियां मद । सामर्थ्याचा ।।९८४।।
तयांसवें झुंज । देवोनि सहज । दुष्टांचा त्वां माज । नष्ट केला ।।९८५।।
ऐशा थोर गोष्टी । विश्वाच्या [2] वाक्पटीं । लिहोनि किरीटी । यश जोडीं ।।९८६।।

संजय उवाच–
एतच्छ्रुत्वा वचनं केशवस्य
कृताञ्जलिर्वेपमानः किरीटी ।
नमस्कृत्वा भूय एवाह कृष्णं
सगद्गदं भीतभीतः प्रणम्य ।।३५।।

राहिले अपूर्ण । ज्याचे मनोरथ । ऐसा जो का नाथ । कौरवांचा ।।९८७।।
तया सांगताहे । संजय हें सर्व । म्हणे ज्ञानदेव । निवृत्तीचा ।।९८८।।
सत्य-लोकांतून । सुटे गंगाजळ । मग खळखळ । वाहे जैसें ।।९८९।।
तैसा वाक्प्रवाह । विशाळ गंभीर । भासला साचार । श्रीहरीचा ।।९९०।।
महा-मेघांचे कीं । उसळतां लोट । होय गडगडाट । नभीं जैसा ।।९९१।।
नातरी मंदरें । होतां घुसळण । राहिला घुमोन । क्षीरार्णव ।।९९२।।
तैसे महा-नाद । गंभीर ते शब्द । बोले [3] विश्व-कंद । विश्वरूप ।।९९३।।
आली जिये क्षणीं । देवाची ती वाणी । घोघावत कानीं । अर्जुनाच्या ।।९९४।।
तिये क्षणीं तेथें । सुख किंवा भय । दुणावलें काय । नेणों आम्ही ।।९९५।।
परी थरथर । सर्व हि शरीर । तयाचें साचार । कांपूं लागे ।।९९६।।
भिडले अमोल । देवाचे ते बोल । अंतरीं सखोल । म्हणोनियां ।।९९७।।
२१ ठेवी वेळोवेळां । चरणीं ललाट । जोडोनियां हात । नम्रपणें ।।९९८।।
मुखांतुनी शब्द । काढावया पाहे । तंव दाटताहे । कंठ त्याचा ।।९९९।।

---

१ बाणानें किंवा बंदुकीनें नेम धरणे. २ तोंडी. ३ विश्वाचें मूळरूप असा कृष्ण.

म्हणावें हें काय । सुख किंवा भय । तुम्ही च निर्णय । करा ह्याचा ॥१०००॥
परी देवाची ती । ऐकोनियां [1] उक्ति । ऐसी झाली स्थिति । अर्जुनाची ॥१००१॥
जाणिलें हें पूर्ण । अहो श्रोतेजन । यथार्थ पाहोन । श्लोक-पदें ॥१००२॥
असो तैसा चि तो । मग भीतभीत । चरण वंदीत । बोले पुन्हां ॥१००३॥

अर्जुन उवाच–
स्थाने हृषीकेश तव प्रकीर्त्या
जगत्प्रहृष्यत्यनुरज्यते च ।
रक्षांसि भीतानि दिशो द्रवन्ति
सर्वे नमस्यन्ति च सिद्धसंघा: ॥३६॥

म्हणे सांगितलें । ऐसें जें आपण । 'अर्जुना, मी जाण । असें काळ ॥१००४॥
ग्रासितसें विश्व । कीं तो माझा खेळ' । बोल हा अढळ । मानूं तुझा ॥१००५॥
परी तुवां काळें । स्थितीचिया वेळे । ग्रासावें हें जुळे । कैसें सांग ॥१००६॥
देहींचें तारुण्य । काढोनियां तेथें । वार्धक्य नसतें । आणूं ये का ? ॥१००७॥
ग्रासावया आज । पाहसी विश्वातें । परी बहुधा तें । न घडेल ॥१००८॥
न लोटतां चार । प्रहर साचार । माध्यान्हीं भास्कर । मावळे का ? ॥१००९॥
तुज अखंडित । काळातें हि जाण । समय हे तीन । नसती का ? ॥१०१०॥
[2] सर्ग-स्थिति-लय । तीन हे समय । जो तो बळी होय । त्या त्या काळीं ॥१०११॥
जिये वेळीं होय । उत्पत्ति-समय । नाहीं स्थिति-लय । तिये वेळीं ॥१०१२॥
स्थितीचिया वेळे । उत्पत्ति-प्रलय । दोहोंचा हि लय । होत असे ॥१०१३॥
तेविं प्रळयाची । वेळ येतां मग । स्थिति आणि [3] सर्ग । मावळती ॥१०१४॥
ऐसा असे क्रम । अनादि अढळ । सदा सर्वकाळ । [4] अबाधित ॥१०१५॥
आतां सर्व जग । स्थितीचा च भोग । घेत असे चांग । आज जरी ॥१०१६॥
तरी सांग मीं हें । ग्रासिलें सकल । ऐसे कैसे बोल । बोलसी तूं ॥१०१७॥
तंव देव म्हणे । सांगितला येथ । ईश्वरी संकेत । तुजलागीं ॥१०१८॥
मृत्यूचिया मुखीं । गेलीं दोन्ही दळें । तुज दाखविलें । प्रत्यक्ष हें ॥१०१९॥

---

१ बोलणें. २ निर्माण होणें-राहणें-नाश पावणें. ३ उत्पत्ति. ४ कायम.

परी इतर जें । विश्व हें सकळ । तें हि यथाकाळ । संहरेल ॥१०२०॥
ऐशा परी कृष्ण । देव भगवंत । जंव हा संकेत । सांगतसे ॥१०२१॥
तंव पंडु-सुतें । देखिले मागुते । यथास्थित तेथें । सर्व लोक ॥१०२२॥
मग म्हणे पार्थ । देवा तूं साचार । होसी सूत्रधार । विश्वाचा ह्या ॥१०२३॥
नव्हे का हें पुन्हां । दिसतसे येथ । जग व्यवस्थित । होतें तैसें ॥१०२४॥
परी दु:खार्णवीं । पडले जे जीव । तयांचा सद्भाव । पाहोनियां ॥१०२५॥
उद्धरसी त्यांसी । प्रभो हृषीकेशी । कीर्ति तुझी ऐसी । आठवितों ॥१०२६॥
भोगीतसें महा–। सुखाचा सोहळा । कीर्ति वेळोवेळां । आठवोनि ॥१०२७॥
आनंदामृताच्या । लाटांवरी साच । करीतसें नाच । देवदेवा ॥१०२८॥
आतां सर्व जग । वांचलें हें चांग । धरी [1] अनुराग । तुझ्या ठायीं ॥१०२९॥
तूं चि दुर्जनांचा । करिसी संहार । जगीं वारंवार । प्रकटोनि ॥१०३०॥
महा-भयें दूर । दाही दिशांपार । पळती [2] असुर । त्रिलोकींचे ॥१०३१॥
सिद्ध-संघ देव । किन्नर गंधर्व । किंबहुना सर्व । चराचर ॥१०३२॥
होतां चि दर्शन । आनंद पावोन । करीत वंदन । तुजलागीं ॥१०३३॥

कस्माच्च ते न नमेरन्महात्मन्
गरीयसे ब्रह्मणोऽप्यादिकर्त्रे ।
अनन्त देवेश जगन्निवास
त्वमक्षरं सदसत्तत्परं यत् ॥३७॥

तुझे हे पावन । सोडोनि चरण । कां गेले पळून । राक्षस ते ॥१०३४॥
हें तों काय देवें । सांगावया हवें । सहजें जाणवे । आम्हांसी हि ॥१०३५॥
काय पळभर । राहेल अंधार । अंबरीं भास्कर । उगवतां ॥१०३६॥
आत्म-प्रकाशाची । खाण तूं विराट । झालासी प्रकट । आज येथें ॥१०३७॥
म्हणोनियां दुष्ट । [3] निशाचरें नष्ट । झालीं ऐसें स्पष्ट । कळों आलें ॥१०३८॥
प्रभो पर-ब्रह्मा । [4] हृदयाभिरामा । आजवरी आम्हां । ठाउकें ना ॥१०३९॥
परी आतां तुझी । थोरवी गंभीर । देखिली साचार । विश्वरूपा ॥१०४०॥

---

१ प्रेम; भक्ति. २ दैत्य. ३ पिशाच्च-राक्षसादि. ४ हृदयाला आनंद देणाऱ्या.

भूत-समूहांच्या । पसरती वेली । नाना जगें झालीं । जेथोनियां ।।१०४१।।
* आदिमायेसी त्या । प्रसवली साच । इच्छा गा तुझी च । विश्वरूपा ।।१०४२।।
देवा तूं अपार । नित्य-तत्त्व-रूप । अनंत अमाप । गुण तुझे ।।१०४३।।
देवांचा हि देव । होसी तूं नि:सीम । सर्वां ठायीं सम । निरंतर ।।१०४४।।
त्रिभुवनालागीं । तुझा चि आधार । सदा [१] शुभंकर । अक्षर तूं ।।१०४५।।
प्रभो [२] संतासंत । तूं चि गा समस्त । तया हि अतीत । तें हि तूं चि ।।१०४६।।

त्वमादिदेवः पुरुषः पुराण–
स्त्वमस्य विश्वस्य परं निधानम् ।
वेत्तासि वेद्यं च परं च धाम
त्वया ततं विश्वमनन्तरूप ।।३८।।

प्रकृति-पुरुषांचें । होसी [३] मूळपीठ । अनादि वैकुंठ–। नायका तूं ।।१०४७।।
महत्तत्त्वाचा हि । शेवट तूं साच । पुरातन तूं च । विश्वरूपा ।।१०४८।।
होसी तूं सकळ । विश्वाचें जीवन । जीवांसी निधान । तूं चि एक ।।१०४९।।
भूत–भविष्याचें । ज्ञान तुझ्या हातीं । सुखावती श्रुती । देखोनियां ।।१०५०।।
व्यापिते जी माया । सर्व त्रैलोक्यास । आधार तियेस । [४] अभेदा तूं ।।१०५१।।
म्हणोनियां तुज । श्रेष्ठ परं-धाम । ऐसें [५] सार्थ नाम । दिलें जाय ।।१०५२।।
माया महद्ब्रह्म । तें हि कल्प-क्षयीं । प्रभो तुझ्या ठायीं । होई लीन ।।१०५३।।
तुवां चि हें विश्व । विस्तारिलें सर्व । नसे रिता ठाव । तुजविण ।।१०५४।।
प्रभो तुझीं रूपें । अनंत अपार । वानावें साचार । तुज कोणें ।।१०५५।।

वायुर्यमोऽग्निर्वरुणः शशाङ्कः
प्रजापतिस्त्वं प्रपितामहश्च ।
नमो नमस्तेऽस्तु सहस्रकृत्वः
पुनश्च भूयोऽपि नमो नमस्ते ।।३९।।

नमः पुरस्तादथ पृष्ठतस्ते
नमोऽस्तु ते सर्वत एव सर्व ।

---

* परिशिष्ट पहा. १ कल्याण करणारा. २ सत्य आणि मिथ्या. ३ मूळ जागा. ४ एकरूपा. ५ यथार्थ.

अनन्तवीर्यामितविक्रमस्त्वं
सर्वं समाप्नोषि ततोऽसि सर्वः ।।४०।।

दिसे चि ना ऐसा । एक हि पदार्थ । नाहींस तूं ज्यांत । विश्वरूपा ।।१०५६।।
सर्वदा सर्वत्र। असे तुझा वास । कोठें तूं नाहींस । ऐसें नाहीं ।।१०५७।।
असो आतां जैसा । होसी तूं श्रीहरी । तैशा तुज करीं । नमस्कार ।।१०५८।।
वायु तूं अनंता । यम [1] नियमिता । अन्नें पचविता । अग्नि तो तूं ।।१०५९ ।।
प्रजापतीचा हि । पिता तूं परम । वरुण तूं सोम । प्रजापति ।।१०६०।।
आणि जें जें कांहीं । आकारलें येथ । किंवा जें [2] अव्यक्त । निराकार ।।१०६१।।
तया तैसिया हि । तुज वारंवार । करीं नमस्कार । जगन्नाथा ।।१०६२।।
ऐशा परी तेथें । जोडोनियां हात । स्तुति-स्तोत्रें गात । प्रेमभरें ।।१०६३।।
म्हणे तुज पुन्हां । असो नमस्कार । असो नमस्कार । विश्वरूपा ।।१०६४।।
मग तो अर्जुन । पाहे [3] न्याहाळून । मागुतीं संपूर्ण । श्रीमूर्तीतें ।।१०६५।।
आणि म्हणे तुज । असो नमस्कार । असो नमस्कार । विश्वरूपा ।।१०६६।।
चराचरीं देखे । सर्वत्र तें एक । म्हणोनि मस्तक । नमवोनि ।।१०६७।।
पुन्हां म्हणे तुज । असो नमस्कार । असो नमस्कार । विश्वरूपा ।।१०६८।।
जंव ऐसीं रूपें । अद्भूत अनंत । होतीं प्रकटत । पार्थापुढें ।।१०६९।।
तंव तंव तुज । असो नमस्कार । असो नमस्कार । हें चि म्हणे ।।१०७०।।
नाठवे आणिक । स्तुतिस्तोत्र तें हि । आणि निवांत हि । राहवे ना ।।१०७१।।
नेणों प्रेमभावें । कैसा वारंवार । असो नमस्कार । हें चि म्हणे ।।१०७२।।
काय सांगूं फार । ह्यापरी सहस्र । केले नमस्कार । पंडु-सुतें ।।१०७३।।
मग पुन्हां म्हणे । सन्मुख तूं उभा । तुज पद्म-नाभा । नमस्कार ।।१०७४।।
तुज पाठ-पोट । आहे किंवा नाहीं । मज [4] कासया हि । उठाठेव ।।१०७५।।
जरी पाठमोरा । होसी तूं साचार । तरी नमस्कार । तैशा तुज ।।१०७६।।
पाठमोरा ऐसें । म्हणावें तुम्हासी । उभा तूं पाठीशीं । म्हणोनियां ।।१०७७।।
एऱ्हवीं सन्मुख–। [5] विन्मुख ही भाषा । घडे ना विश्वेशा । तुझ्या ठायीं ।।१०७८।।

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

१ शासनकर्ता.   २ दृष्टीला न दिसणारें.   ३ निरखून.   ४ कशाला.   ५ पाठमोरा.

प्रभो तुझीं ऐसीं । अंगें अगणित । मी तों असमर्थ । वानावया ।।१०७९।।
म्हणोनियां तुज । सर्वात्मका सर्वा । असो महा-देवा । नमस्कार ।।१०८०।।
प्रभो तुझें बळ । अपार अनंत। थोर अगणित । पराक्रम ।।१०८१।।
सर्व काळीं सम । होसी तूं साचार । तुज नमस्कार । सर्वरूपा ।।१०८२।।
शून्यामाजीं सर्व । शून्यमय जैसें । होवोनियां असे । [1]शून्य चि तें ।।१०८३।।
तैसा सर्वपणें । सर्वांसी व्यापून । सर्व तूं होऊन । राहिलासी ।।१०८४।।
क्षीर-सागरांत । तरंग हि साच। जैसे क्षीराचे च । संभवती ।।१०८५।।
तैसा विश्व-रूपा । सर्वत्र सकळ । त्रि-लोकीं केवळ । तूं चि होसी ।।१०८६।।
म्हणोनि तूं विश्वा-। वेगळा नाहींस । ऐसें प्रत्ययास । आलें आतां ।।१०८७।।

सखेति मत्वा प्रसभं यदुक्तं
हे कृष्ण हे यादव हे सखेति ।
अजानता महिमानं तवेदं
मया प्रमादात्प्रणयेन वापि ।।४१।।

नव्हतें केव्हां च । ओळखिलें देवा । ऐशा तुज सर्वा । सर्वात्मका ।।१०८८।।
म्हणोनियां सखा । सोयरा तूं साच । नातें एवढें च । बाळगोनि ।।१०८९।।
केलें तुजपाशीं । तैसें च वर्तन । थोरवी नेणोन । प्रभो तुझी ।।१०९०।।
[2]सडासंमार्जनीं । वेंचिलें अमृत । झालें अनुचित । केवढें हें ! ।।१०९१।।
गेलों मी भुलून । [3]शिंगरूं घेऊन । टाकिली देऊन । काम-धेनु ।।१०९२।।
जोडला खडक । दैवें परिसाचा । परी नाहीं साचा । ओळखिला ।।१०९३।।
म्हणोनियां तया । फोडोनियां वायां । दडपिला [4]पाया-। भरणींत ।।१०९४।।
दिव्य कल्पतरु। तोडोनियां जाण । शेतासी कुंपण । घातलें मीं ।।१०९५।।
भाग्यें हातीं आले । चिंतामणी भले । परी ते फेंकिले । मूढपणें ।।१०९६।।
तैसें नोळखून । तुझें प्रभुपण। सखा चि मानून । वागलों मी ।।१०९७।।
पाहें उघड हें । येथें चि सांप्रत । कायसी ही मात । संग्रामाची ।।१०९८।।
परी तयासाठीं । तुज जगजेठी । आपुला सारथी । केलें आम्हीं ।।१०९९।।

---

१ आकाश. २ सडासारवण करण्यांत. ३ घोड्यांचे पोर. ४ घराच्या चौथऱ्यांत.

कराया शिष्टाई । कौरवांच्या घरा । तुज सर्वेश्वरा । पाठविलें ॥११००॥
ऐशा रीती खर्चीं । घातलें गा तुज । [१] व्यवहार-काज । साधावया ॥११०१॥
समाधि-सुख तूं । होसी योगियांचें । नेणोनि हें साचें । मूर्खपणें ॥११०२॥
थट्टाविनोदांत । तुझा वेळोवेळां । [२] अवमान केला । वासुदेवा ॥११०३॥

यच्चावहासार्थमसत्कृतोऽसि
विहारशय्यासनभोजनेषु ।
एकोऽथवाप्यच्युत तत्समक्षं
तत्क्षामये त्वामहमप्रमेयम् ॥४२॥

विश्वाचें तूं मूळ । अनादि अनंता । सहजें बैसतां । सभेमाजीं ॥११०४॥
सोयरे संबंधें । तेथें हि स्वच्छंदें । हवें तें विनोदें । बोलिलों मी ॥११०५॥
जात असूं आम्ही । तुझ्या घरीं जेव्हां । सन्मानिसी तेव्हां । आम्हांसी तूं ॥११०६॥
न मानिसी तरी । रूसावें श्रीहरी । प्रेमें तुजवरी । केव्हां केव्हां ॥११०७॥
मग घालावी तूं । माझी समजूत । पायांसी हि हात । लावोनियां ॥११०८॥
अजाणतां ऐशा । किती झाल्या गोष्टी । सर्व हि तूं पोटीं । घातल्या त्या ॥११०९॥
बैसें तुजपुढें । पाठ फिरवून । सौंगडी मानून । तुजलागीं ॥१११०॥
योग्यता ही माझी । नव्हे नव्हे स्वामी । परी चुकलों मी । वासुदेवा ॥११११॥
देवा तुझ्या संगें । करूं दंगामस्ती । दांडपट्टा कुस्ती । खेळोनियां ॥१११२॥
करोनि धिःकार । आवेशें भांडावें । खेळतां स्वभावें । [३] सारीपाट ॥१११३॥
चांग वस्तु ती ती । एकाएकीं मागूं । तुज गोष्टी सांगूं । पांडित्याच्या ॥१११४॥
तेविं तुझें काय । लागतसों आम्हीं । ऐसें [४] पुसों स्वामी । तुजलागीं ॥१११५॥
ऐसे अपराध । तुज सांगूं किती । जे न सामावती । त्रि-भुवनीं ॥१११६॥
परी नेणतां चि । घडले हातून । देवा तुझी आण । वाहतसें ॥१११७॥
आठवण माझी । करिसी श्रीहरी । लोभें अवसरीं । भोजनाच्या ॥१११८॥
परी तुजवरी । रुसूनफुगून । बाजूसी बैसून । रहावें मीं ॥१११९॥
अंतःपुरामाजीं । राहतां खेळत । आशंकेना चित्त । माझें देवा ॥११२०॥

---

१ व्यवहारांतील कामकाज. २ अपमान. ३ सोंगट्यांचा खेळ. ४ विचारूं; विचारीत असूं.

तुझ्या शय्येवरी । तुझ्या चि शेजारीं । झोंपलों श्रीहरी । निःसंकोच ॥११२१॥
अरे कृष्णा ऐसी । मारितसूं हांक । समजोनि एक । यादव तूं ॥११२२॥
निघालासी तरी । होतों बैसवीत । आपुली शपथ । घालोनियां ॥११२३॥
सांडोनियां भीड । तुझ्या समवेत । होतों मी बैसत । एकासनीं ॥११२४॥
न मानावी तुवां । बोलिली जी गोष्ट । प्रभो ऐसा धीट । झालों होतों ॥११२५॥
ऐसें अनुचित । घडलें बहुत । परिचय दाट । म्हणोनियां ॥११२६॥
तरी एक एक । किती गोष्टी ऐशा । सांगू हृषीकेशा । तुजलागीं ॥११२७॥
आतां एकदां चि । टाकितों बोलून । मी तों असें पूर्ण । अपराधी ॥११२८॥
समक्ष वा पश्चात् । ऐसें अनुचित । घडलें समस्त । जें जें कांहीं ॥११२९॥
तें तें सर्व पोटीं । घालावें श्रीहरी । मातेचिया परी । कृपामूर्ते ॥११३०॥
गढूळ उदक । घेवोनि सरिता । मिळावया जातां । सागरातें ॥११३१॥
तियेचा स्वीकार । केल्याविना कांहीं । अन्य गति नाहीं । तयालागीं ॥११३२॥
[1] प्रमादें वा प्रेमें । बोलिलों विरोधें । तुवां दया-निधे । क्षमावें तें ॥११३३॥
तुझ्या क्षमा-वृत्ति-। बळें [2] त्रिविक्रमा । धरी भूत-ग्रामा । धरित्री हि ॥११३४॥
म्हणोनियां तुज । विनवावें किती । प्रभो रमा-पति । [3] अप्रमेया ॥११३५॥
झाले अपराध । क्षमा करी आतां । शरण अनंता । आलों तुज ॥११३६॥

पितासि लोकस्य चराचरस्य
त्वमस्य पूज्यश्च गुरुर्गरीयान् ।
न त्वत्समोऽस्त्यभ्यधिकः कुतोऽन्यो
लोकत्रयेऽप्यप्रतिमप्रभावः ॥४३॥

तुझें थोरपण । जाणिलें मीं साचें । होसी तूं जगाचें । जन्म-स्थान ॥११३७॥
हरि-हरादिक । सर्व हि देवांची । देवता तूं साची । होसी थोर ॥११३८॥
शब्द-ब्रह्मातें हि । पढविता साच । आदिगुरु तूं च । वासुदेवा ॥११३९॥
सर्वां भूतीं एक । सारिखा साचार । होसी तूं गंभीर । रमा-कांता ॥११४०॥
होसी अद्वितीय सर्वगुणश्रेष्ठ । श्रीहरी वैकुंठ-। नायका तूं ॥११४१॥

---

१ चुकीनें; गाफिलपणें. २ परमेश्वरा. ३ प्रमाणांनीं सिद्ध करतां न येणाऱ्या.

प्रभो सर्वव्यापी । होसी तूं अजोड । मज हें उघड । दिसतसे ॥११४२॥
तुझ्या चि पासोनि । आकाश हें झालें । ज्यांत सांठवलें । चराचर ॥११४३॥
ऐशा तुज जोड । पहावया जावें । तंव परतावें । लाजोनियां ॥११४४॥
मग तुझ्याहून । असे कोणी श्रेष्ठ । नको च ही गोष्ट । बोलावया ॥११४५॥
तुजऐसा किंवा । तुजहून थोर । नाहीं च साचार । त्रि-भुवनीं ॥११४६॥
ऐसा अ-द्वितीय । एक तूं श्री-पति । तुझें वानूं किती । थोरपण ॥११४७॥

तस्मात्प्रणम्य प्रणिधाम कायं
प्रसादये त्वामहमीशमीड्यम् ।
पितेव पुत्रस्य सखेव सख्युः
प्रियः प्रियायार्हसि देव सोढुम् ॥४४॥

मग तो अर्जुन । ह्यापरी बोलून । पुन्हां लोटांगण । घालीतसे ॥११४८॥
तों चि [1] सात्त्विकांचें । येवोनि भरतें । भक्ति-प्रेमें दाटे । कंठ त्याचा ॥११४९॥
ऐसा तो [2] सद्गद । म्हणे जगन्नाथा । प्रसन्न हो आतां । कृपा-सिंधो ॥११५०॥
अपराधार्णवीं । बुडालों दातारा । करोनियां त्वरा । उद्धरावें ॥११५१॥
आमुचा तूं सखा–। सोयरा म्हणोन । नाहीं दिला मान । जगद्बंधो ॥११५२॥
देवदेवा तुज । सारथी करून । आम्हीं स्वामीपण । गाजविलें ॥११५३॥
प्रभो तूं चि एक । वर्णनीय साच । परी तूं मातें च । वाखाणिसी ॥११५४॥
ऐसा मजवरी । तुझा लोभ तरी । मी च गर्व करीं । सभेमाजीं ॥११५५॥
ऐसे अपराध । माझे अगणित । परी पदरांत । घ्यावें मज ॥११५६॥
प्रमादापासोन । करावें रक्षण । होवोनि प्रसन्न । जगन्नाथा ॥११५७॥
हें हि तुम्हांलागीं । विनवाया साच । योग्यता नाहीं च । माझ्या अंगीं ॥११५८॥
परी होय जैसें । लडिवाळपणें । बापाशीं बोलणें । बाळकाचें ॥११५९॥
किंवा जिवलग । [3] सखा भेटतां च । सर्व हि संकोच । सोडोनियां ॥११६०॥
जीं जीं सुखदुःखें । भोगिलीं आपण । करावीं कथन । तीं तीं जैसीं ॥११६१॥
[4] प्राणनाथालागीं । तन-मन-प्राण । सर्व समर्पण । करी जी का ॥११६२॥

---

१ अष्ट सात्विक भावांचें. २ कंठ दाटून येऊन. ३ मित्र; स्नेही. ४ पतीला.

ऐशा कान्तेलागीं । एकांतीं तो [१] कान्त । भेटतां गुपित । बोले जैसी ।।११६३।।
तैशा परी तुम्हां । विनविलें देवा । हेतु पुरवावा । आणिक हि ।।११६४।।

अदृष्टपूर्वं हृषितोऽस्मि दृष्ट्वा
भयेन च प्रव्यथितं मनो मे ।
तदेव मे दर्शय देव रूपं
प्रसीद देवेश जगन्निवास ।।४५।।

निज-विश्वरूप । दाखवावें मज । ऐसें प्रेमें तुज । विनविलें ।।११६५।।
तुवां माझा छंद । पुरविला [२] साचा । होसी तूं भक्तांचा । मायबाप ।।११६६।।
कामधेनु-वत्स । खेळावया द्यावें । अंगणीं लावावे । कल्प-वृक्ष ।।११६७।।
नातरी मांडावा । नक्षत्रांचा खेळ । चंद्रमा निर्मळ । यावा हातीं ।।११६८।।
ऐसा तरी माझा । छंद [३] आगळा च । पुरविला साच । माउली तूं ।।११६९।।
जया अमृताचा । पावावया [४] लेश । लागती सायास । करावया ।।११७०।।
तया अमृताचा । तुवां चातुर्मास । पाडिला पाऊस । देव-देवा ।।११७१।।
भूमि चोखाळून । वाफ्यावाफ्यांतून । टाकिले पेरून । चिंतामणी ।।११७२।।
प्रभो ऐसें मज । केलें तूं [५] कृतार्थ । सर्व मनोरथ । पुरवोनि ।।११७३।।
शिव-ब्रह्म्यातें हि । नाहीं ज्याची वार्ता । रूप तें अनंता । दाविलें तूं ।।११७४।।
उपनिषदांसी । नाहीं ज्याची भेटी । पडे ना जें दृष्टी । ब्रह्मादिकां ।।११७५।।
तें चि अंतरींचें । तुवां निज गुज । उकलोनि मज । दाखविलें ।।११७६।।
कल्पादिपासोन । आजवरी माझे । होवोनियां जे जे । जन्म गेले ।।११७७।।
तया सर्वांचा हि । वाचोनियां पाढा । घेतला मीं झाडा । तरी देवा ।।११७८।।
तुझें विश्व-रूप । देखिलें ऐकिलें । ऐसें आढळलें । नाहीं मज ।।११७९।।
जया स्वरूपाचें । अंगण हि ठावें । नाहीं च स्वभावें । बुद्धीलागीं ।।११८०।।
आणि चित्तालागीं । जया स्वरूपाची । कल्पना हि साची । करवे ना ।।११८१।।
तया स्वरूपाची । दृष्टीलागीं भेट । नको च ही गोष्ट । बोलावया ।।११८२।।
आजवरी नाहीं । देखिलें ऐकिलें । ऐसें जें आपुलें । विश्वरूप ।।११८३।।

---

१ पति. २ खरोखर. ३ निराळाच. ४ किंचित् अंश. ५ कृतकृत्य.

तें चि मज डोळां । दाखविलें देवा । म्हणोनियां जीवा । हर्ष झाला ॥११८४॥
परी कराव्या गा । तुजसवें गोष्टी । ऐसें [1] जगजेठी । वाटे मज ॥११८५॥
प्रेमानंदें तुज । द्यावें आलिंगन । सन्निध राहून । निरंतर ॥११८६॥
तरी तुझीं मुखें । अनंत अपार । बोलावें साचार । कोणापाशीं ॥११८७॥
तुज मिठी देऊं । तरी हृषीकेशी । सर्वथा तूं होसी । [2] अनावर ॥११८८॥
कैसें वाऱ्यासंगें । घडावें धांवणें । किंवा मिठी देणें । आकाशासी ॥११८९॥
महा-सागरांत । कैसी भगवंता । येईल खेळतां । जल-क्रीडा ॥११९०॥
प्रभो विश्वरूप । हें तुझें पाहून । गेलों मी भिऊन । एकाएकीं ॥११९१॥
तरी आतां घेई । आवरोनि ह्यास । एवढी च आस । पूर्ण करीं ॥११९२॥
कौतुकें करोनि । जगाचा प्रवास । सुखें स्व-गृहास । यावें जैसें ॥११९३॥
तैसें प्रभो तुझें । रूप चतुर्भुज । आम्हासी सहज । विसावा तो ॥११९४॥
आम्ही योगजात । अभ्यासावें [3] साङ्ग । अनुभव मग । हा चि घ्यावा ॥११९५॥
रूप चतुर्भुज । सांवळें सगुण । विश्रांतीचें स्थान । तें चि एक ॥११९६॥
आम्ही सर्व शास्त्रीं । व्हावें [4] पारंगत । एक हा सिद्धान्त । जाणावया ॥११९७॥
आणि यज्ञ-याग । करावे सकळ । परी हें चि फळ । मिळवाया ॥११९८॥
सकळ हि तीर्थें । हिंडावीं पावन । घ्यावया दर्शन । रूपाचें ह्या ॥११९९॥
आम्हीं दान-पुण्य । करावें जें कांहीं । व्हावें तें सर्व हि । ह्या चि साठीं ॥१२००॥
रूप चतुर्भुज । सांवळें सुंदर । भेटावें माहेर । विश्रांतीचें ॥१२०१॥
घेतली आवडी । ही च माझ्या जीवें । पुरवावी देवें । झडकरी ॥१२०२॥
माझ्या अंतरींचा । जाणसी तूं भाव । देवांचा तूं देव । पूजनीय ॥१२०३॥
होवोनि प्रसन्न । पुनरपि मज । रूप चतुर्भुज । दाखवीं तें ॥१२०४॥

किरीटिनं गदिनं चक्रहस्त–
मिच्छामि त्वां द्रष्टुमहं तथैव
तेनैव रूपेण चतुर्भुजेन
सहस्रबाहो भव विश्वमूर्ते ॥४६॥

---

१ जगांत मोठा; ईश्वर. २ आटोक्यांत न येणारा. ३ संपूर्ण. ४ तरबेज; प्रवीण.

शोभे अंग-कांति । नील-वर्ण कैसी । जणूं आकाशासी । रंगवीत ॥१२०५॥
नीळ-कमळातें । जी का भूषविते । निळी झांक देते । [1]इंद्रनीळा ॥१२०६॥
सुटावा सुगंध । जैसा [2]मरगजा । फुटाव्या कीं भुजा । आनंदासी ॥१२०७॥
तैसें मदनासी । लाधलें सौंदर्य । घेवोनि आश्रय । [3]जानूंवरी ॥१२०८॥
कैसें मुकुटातें । मस्तकीं ठेवितां । मस्तकें मुकुटा । शोभविलें ॥१२०९॥
जया अंगाचिया । सुतेजें सहज । चढलासे [4]साज । शृंगारासी ॥१२१०॥
इंद्रधनुष्याच्या । कमानींत चांग । आवरिला मेघ । नभामाजीं ॥१२११॥
तैसी शोभे मूर्ति । सांवळी सुंदर । वैजयंती हार । घालोनियां ॥१२१२॥
दैत्यांतें हि सदा । देई मोक्ष-पदा । उदार ती गदा । विराजते ॥१२१३॥
कैसें सुदर्शन-। चक्र तुझ्या हातीं । मिरवे श्री-पति । सौम्य तेजें ॥१२१४॥
काय सांगूं फार । ऐसें मनोहर । रूपडें साचार । तुझें देवा ॥१२१५॥
पहावया जीवा । लागली उत्कंठा । म्हणोनियां आतां । तैसा होईं ॥१२१६॥
विश्व-रूपाचे हे । सोहळे भोगून । निवाले नयन । हृषीकेशा ॥१२१७॥
आतां कृष्ण-मूर्ति । देखावयासाठीं । जाहले ते अति । उतावीळ ॥१२१८॥
[5]गोजिरें तें रूप । पाहिल्यावांचोन । नाहीं समाधान । चित्तालागीं ॥१२१९॥
सगुण साकार । कृष्णमूर्तीपुढें । विश्वरूप थोडें । वाटे मज ॥१२२०॥
तरी आतां भोग-। मोक्षाचिया ठायीं । हरिविण नाहीं । दुजें कांहीं ॥१२२१॥
म्हणोनि तैसा चि । साकार तूं होईं । आवरोनि घेईं । विश्व-रूप ॥१२२२॥

श्रीभगवानुवाच–

मया प्रसन्नेन तवार्जुनेदं
रूपं परं दर्शितमात्मयोगात्
तेजोमयं विश्वमनन्तमाद्यं
यन्मे त्वदन्येन न दृष्टपूर्वम् ॥४७॥

भक्त अर्जुनाचे । ऐकोनि हे बोल । वाटलें नवल । देवालागीं ॥१२२३॥
म्हणे पार्था कोणी । ऐसा अविचारी । नाहीं आजवरी । देखिला मीं ॥१२२४॥

---

१ नीलमण्याचा. २ पाचूच्या रत्नाला; पाचूला. ३ (गुडघ्यांवर) मांड्यांचा. ४ शोभा (आली). ५ सुंदर.

केवढी ही वस्तु । लाभली [१] अगाध । परी तो आनंद । भोगिसी ना ॥१२२५॥
नेणों कां गा ऐसा । [२] हेकाड तूं होसी । काय हें बोलसी । भिवोनियां ॥१२२६॥
देतसों सगुण । साकार दर्शन । प्रसन्न होवोन । भक्तालागीं ॥१२२७॥
निज अंतरींची । परी गूढ खूण । ठेवितों राखून । जीवापाड ॥१२२८॥
परी तुझी आस । पुरवावी आज । म्हणोनि हें निज-। विश्व-रूप ॥१२२९॥
पार्था तुजपुढें । प्रकटिलें साच । जीव-प्राणाचें च । ओतलें जें ॥१२३०॥
कैसी नेणों तुझी । घेवोनि आवडी । प्रसन्नता वेडी । झाली माझी ॥१२३१॥
म्हणोनियां गूढ । विश्व-रूपाची हि । जगीं गुढी पाहीं । उभारिली ॥१२३२॥
तें हें [३] परात्पर । अपारां अपार । जेथोनि अवतार । कृष्णादिक ॥१२३३॥
धनंजया शुद्ध । ज्ञान-तेजाचें च । ओतलें हें साच । विश्व-रूप ॥१२३४॥
सर्वांसी हें मूळ । अनंत अढळ । अखंड केवळ । विश्वात्मक ॥१२३५॥
नानाविध केलीं । साधनें बहुत । तरी नव्हे प्राप्त । म्हणोनियां ॥१२३६॥
तुजविण कोणी । विश्वरूप भलें । ऐकिलें देखिलें । नाहीं च हें ॥१२३७॥

न वेदयज्ञाध्ययनैर्न दानै-
र्न च क्रियाभिर्न तपोभिरुग्रैः ।
एवंरूपः शक्य अहं नृलोके
द्रष्टुं त्वदन्येन कुरुप्रवीर ॥४८॥

पार्था वेद ह्यासी । पहावया गेले । तों चि स्वीकारिलें । मौन त्यांनीं ॥१२३८॥
यज्ञ-याग ते हि । स्वर्गापावेतों च । जावोनियां साच । परतले ॥१२३९॥
योग-साधक ते । देखोनि [४] सायास । गेले योगाभ्यास । सोडोनियां ॥१२४०॥
कोणी [५] जन्मवेरीं । केलें अध्ययन । नव्हे च दर्शन । तरी ऐसें ॥१२४१॥
सकळ सत्कर्में । झालीं उत्कंठित । रूप हें अद्‌भुत । देखावया ॥१२४२॥
परी सत्य लोका-। पलींकडे कांहीं । धांव गेली नाहीं । तयांची हि ॥१२४३॥
तपें उग्रपण । टाकिलें सांडून । ऐश्वर्य देखून । आगळें हें ॥१२४४॥
विविध साधनां-। पासोनि साचार । ऐसें फार दूर । राहिलें जें ॥१२४५॥

---

१ थोर; गहन. २ हट्टी. ३ अत्यंत श्रेष्ठ; मायेपलीकडील. ४ कष्ट. ५ जन्मभर.

तें हें विश्वरूप । तुवां अनायासें । आज येथें जैसें । देखिलें गा ।।१२४६।।
तैसें मृत्युलोकीं । कोणासी हि साच । पहाया नाहीं च । सांपडलें ।।१२४७।।
देखें सृष्टिकर्त्या । ब्रह्मदेवातें हि । [१] लाधलें हें नाहीं । श्रेष्ठ भाग्य ।।१२४८।।
ध्यान-संपत्तीचा । एकटा तूं धनी । होसी त्रिभुवनीं । पार्था आज ।।१२४९।।

मा ते व्यथा मा च विमूढभावो
दृष्ट्वा रूपं घोरमीदृङ्ममेदम् ।
व्यपेतभी: प्रीतमना: पुनस्त्वं
तदेव मे रूपमिदं प्रपश्य ।।४९।।

म्हणोनि तूं मानीं । धन्य आपणातें । देखोनि हें येथें । विश्व-रूप ।।१२५०।।
विश्व-रूपाची ह्या । आपुलिया चित्तीं । नको धरूं भीति । लेशमात्र ।।१२५१।।
विश्व-रूपाहून । दुजें कांहीं आतां । नको पंडु-सुता । मानूं चांग ।।१२५२।।
[२] अथांग सागर । अमृतें भरला । दैवें प्राप्त झाला । एकाएकीं ।।१२५३।।
मग बुडायाचें । बाळगोनि भय । कोणी निघे काय । सोडोनि तो ।।१२५४।।
किंवा सुवर्णाचा । लाभतां डोंगर । एवढा हा थोर । नको आम्हां ।।१२५५।।
ऐसा अविचारें । देवोनि नकार । तयाचा अव्हेर । करावा का ।।१२५६।।
दैवयोगें हाता । येतां चिंतामणीं । [३] भार तो म्हणोनि । फेंकावा का ।।१२५७।।
ना तरी ती कैसी । पोसावी म्हणोन । द्यावी हाकलोन । काम-धेनु ।।१२५८।।
किंवा शीत-रश्मि । चंद्र आला घरा । न जातां सामोरा । तयालागीं ।।१२५९।।
म्हणेल का कोणी । नीघ होईं दूर । तुझा [४] उष्मा फार । ताप देई ।।१२६०।।
पलीकडे जाईं । पाडितोसी छाया । म्हणावें का सूर्या-। लागीं ऐसें ।।१२६१।।
महा-तेजाचा हा । ठेवा तैसा आज । लाधला सहज । तुजलागीं ।।१२६२।।
तरी आतां ऐसी । नको कासाविसी । [५] गांवढा तूं होसी । कां गा पार्था ।।१२६३।।
सोडोनियां अंग । आलिंगिसी छाया । काय धनंजया । कोपूं आतां ।।१२६४।।
कां गा येथें ऐसा । होसी तूं अधीर । त्यजावया सार । विश्व-रूप ।।१२६५।।
चतुर्भुज रूप । माझें वरिवरी । परी तुज भारी । आवडे तें ।।१२६६।।

---

१ मिळालें. २ मोठा व खोल. ३ ओझें. ४ उष्णता. ५ अडाणी.

विश्वरूप [१] घोर । चतुर्भुज थोर । सोडीं हा विचार । अजूनी हि ।।१२६७।।
नको नको तुज । सगुणाची गोडी । विश्वरूपीं बुडी । दिल्यावीण ।।१२६८।।
पार्था विश्वरूप । जरी हें विशाळ । अक्राळविक्राळ । महा-घोर ।।१२६९।।
तरी पूजनीय । हें चि एक साच । निश्चय ऐसा च । असों देईं ।।१२७०।।
[२] कृपणाचा देह । वरीवरी नाचे । परी चित्त त्याचें । ठेव्यापाशीं ।।१२७१।।
किंवा फिरे जैसी । पक्षिणी आकाशीं । जीव पिलांपाशीं । ठेवोनियां ।।१२७२।।
किंवा जैसी धेनु । चरे रानींवनीं । परी ओढ मनीं । वासराची ।।१२७३।।
तैसें तुझें प्रेम । पार्था निरंतर । जडूं दे अपार । विश्व-रूपीं ।।१२७४।।
मग [३] बाह्यात्कारीं । सख्यत्वाचें सुख । भोगावया देख । श्रीहरीतें ।।१२७५।।
सगुण साकार । सांवळें सुंदर । रूप मनोहर । चतुर्भुज ।।१२७६।।
परी सत्य नित्य । विश्वरूपाठायीं । सदा असों देईं । सद्भाव तूं ।।१२७७।।
सांगतसें तुज । हें चि वारंवार । न पडो विसर । बोलाचा ह्या ।।१२७८।।
नव्हतें हें पूर्वीं । रूप तूं देखिलें । म्हणोनियां भ्यालें । चित्त तुझें ।।१२७९।।
तरी पार्था आतां । सोडोनियां भय । ठेवीं तूं अक्षय । प्रेम येथें ।।१२८०।।
पार्थालागीं ऐसें । सांगोनियां सार । देव सर्वेश्वर । काय बोले ।।१२८१।।
म्हणे [४] करूं आतां । तुझी [४] इच्छा-पूर्ति । सुखें कृष्ण-मूर्ति । [५] न्याहाळीं तूं ।।१२८२।।

संजय उवाच–।
इत्यर्जुनं वासुदेवस्तथोक्त्वा
स्वकं रूपं दर्शयामास भूयः ।
आश्वासयामास च भीतमेनं
भूत्वा पुनः सौम्यवपुर्महात्मा ।।५०।।

ऐसें बोलतां च । देवांचा तो देव । जाहला मानव–। देह-धारी ।।१२८३।।
नवल ना येथ । श्रीहरि समर्थ । परी हें अद्भुत । भक्त-प्रेम ।।१२८४।।
श्रीहरि प्रत्यक्ष । पूर्ण पर-ब्रह्म । दाखवी परम । विश्व-रूप ।।१२८५।।
परी तयाचें तें । स्वरूप थोरलें । नाहीं आवडलें । पार्थालागीं ।।१२८६।।

---

१ भयंकर. २ कंजूष माणसाचा. ३ वरवर. ४ इच्छा पुरवूं. ५ बघ;ी दर्शन घे.

जैसी वस्तु एक । हातीं घेवोनियां । नको म्हणोनियां । टाकावी ती ॥१२८७॥
किंवा रत्नालागीं । ठेवावें दूषण । कीं [1] वधू पाहून । नाकारावी ॥१२८८॥
तैसी अर्जुनाची । तेथें झाली स्थिति । विराट श्रीमूर्ति । पाहोनि ती ॥१२८९॥
देवें तत्त्व-सार । तया सांगितलें । दावोनि आपुलें । विश्व-रूप ॥१२९०॥
स्वयें कृष्णदेव । झाला विश्व-मूर्ति । पार्थावरी प्रीति । केवढी ही ! ॥१२९१॥
आपुलिया हौसे-। सारिखा बरवा । [2] साज घडवावा । सुवर्णाचा ॥१२९२॥
परी पुनरपि । नावडे म्हणून । जैसा आटवून । टाकावा तो ॥१२९३॥
तैसा शिष्याचिया । प्रीतीसाठीं भला । विश्व-रूप झाला । कृष्णदेव ॥१२९४॥
परी तयाच्या तें । मना नाहीं आलें । अद्‌भुत आगळें । विश्व-रूप ॥१२९५॥
म्हणोनि तो देव । पुन्हां कृष्ण झाला । प्रेमें प्रकटला । पार्थापुढें ॥१२९६॥
येथवरी त्रास । सुखें जो साहेल । ऐसा का लाभेल । गुरु कोठें ॥१२९७॥
परी तो संजय । म्हणे नेणों कैसी । आवडी देवासी । अर्जुनाची ॥१२९८॥
व्यापोनियां विश्व । भोंवतीं जें भलें । होतें प्रकटलें । दिव्य तेज ॥१२९९॥
तें चि सांठवलें । मागुतीं सहज । तिये चतुर्भुज । कृष्णरूपीं ॥१३००॥
* 'त्वं पद' तें जैसें । * 'तत्पदीं' सामावे । बीजांत सांठवे । वृक्षाकार ॥१३०१॥
ना तरी जीवाची । जागृति साचार । स्वप्नाचा विस्तार । गिळी जैसी ॥१३०२॥
तैसा देवें मग । विश्वरूप-योग । आवरिला चांग । कृष्णरूपीं ॥१३०३॥
सूर्यप्रभा बिंबीं । हारपावी जैसी । नातरी आकाशीं । मेघ-[3] माला ॥१३०४॥
किंवा जैसी राया । सागराच्या पोटीं । रहावी भरती । जिरोनियां ॥१३०५॥
तैसी विश्वरूपी । वस्त्राची जी घडी । कृष्णरूपीं [4] दडी । [4] देवोनियां ॥१३०६॥
होती राहिली ती । देवें उकलून । दाविली भुलून । पार्थ-प्रेमें ॥१३०७॥
दिव्य वस्त्राची त्या । लांबी रुंदी रंग । न्याहाळीलीं चांग । धनंजयें ॥१३०८॥
मग तयाचिया । पसंतीस भलें । नाहीं उतरलें । म्हणोनियां ॥१३०९॥
तया विश्वरूप-। वस्त्राची स्वभावें । पुनरपि देवें । घडी केली ॥१३१०॥
तों च विश्व-व्यापी । विश्व-रूप घोर । सगुण सुंदर । सौम्य झालें ॥१३११॥

---

* परिशिष्ट पहा. १ नवरी. २ दागिना; दागिन्यांचा संच. ३ ढगांची रांग. ४ लपून; गुप्तपणें.

काय सांगूं फार । श्रीहरीनें थोर । विश्वरूप घोर । आवरोनि ॥१३१२॥
चतुर्भुजरूपीं । पुन्हां प्रकटून । दिले आश्वासन । अर्जुनासी ॥१३१३॥
स्वप्नामाजीं कोणी । विलोकावा स्वर्ग । येतां चि तो मग । जागृतींत ॥१३१४॥
व्हावा अकस्मात । आश्चर्यचकित । तैसा तो विस्मित । पार्थ झाला ॥१३१५॥
ना तरी सद्गुरु । होतां चि प्रसन्न । सर्व [1] भव-ज्ञान । ओसरावें ॥१३१६॥
आणि जैसें व्हावें । तत्त्वाचें स्फुरण । श्रीहरि-दर्शन । तैसें पार्था ॥१३१७॥
श्रीहरीच्या आड । विश्व-रूप थोर । सरतां तें दूर । सुखावे तो ॥१३१८॥
जणूं काळालागीं । जिंकोनियां यावें । मागें हटवावें । महा-वाता ॥१३१९॥
किंवा बाहु-बळें । सप्त हि सागर । उल्लंघोनि पार । व्हावें जैसें ॥१३२०॥
तैसें पार्थालागीं । झालें समाधान । मागुतीं देखून । हरि-रूप ॥१३२१॥
मावळतां सूर्य । जैशा प्रकटती । तारका मागुतीं । आकाशांत ॥१३२२॥
तैसा देखूं लागे । पार्थ चराचर । लोक हि साचार । तिये वेळीं ॥१३२३॥
पाहे तंव देखे । तें चि कुरु-क्षेत्र । तैसें चि तें गोत्र । दोहीं भागीं ॥१३२४॥
आणि शस्त्रास्त्रांचा । समूह अपार । वर्षती सु-धीर । वीर तेथें ॥१३२५॥
मग पार्थ तया । शर-मंडपांत । तैसा चि तो रथ । उभा देखे ॥१३२६॥
देखे [2] धुरेवरी । कृष्ण वनमाळी । तेंवी रथा-तळीं । आपणातें ॥१३२७॥

अर्जुन उवाच–
दृष्ट्वेदं मानुषं रूपं तव सौम्यं जनार्दन ।
इदानीमस्मि संवृत्तः सचेताः प्रकृतिं गतः ॥५१॥

ह्या परी तें सर्व । पूर्वीं होतें तैसें । पार्थ देखतसे । वीर-श्रेष्ठ ॥१३२८॥
मग म्हणे आतां । वांचलों श्री-पति । देखोनि मागुतीं । तुझें रूप ॥१३२९॥
प्रभो माझें ज्ञान । बुद्धीतें सांडोनि । भयें होतें रानीं । प्रवेशलें ॥१३३०॥
अहंकारासंगें । कैसें श्रीगोविंदा । मन [3] परागंदा । झालें होतें ॥१३३१॥
झाले होते बंद । इंद्रिय-व्यापार । वाचा हि साचार । स्तब्ध होती ॥१३३२॥
दुर्दशा ही ऐसी । सर्व शरीराची । झाली होती साची । हृषीकेशा ॥१३३३॥

२२

---

१ संसाराचें-सृष्टीचें-भान. २ रथाच्या पुढील भागावर. ३ बेपत्ता; फरारी.

मन बुद्धि आणि । इंद्रियें हीं सर्व । मागुतीं सजीव । झालीं आतां ।।१३३४।।
लागलीं कराया । आपुले व्यापार । मूळ [1] ठायावर । येवोनियां ।।१३३५।।
म्हणे देवा मज । जाहला संतोष । रूप हें [2] मानुष । देखोनियां ।।१३३६।।
बाळ मी अजाण । चुकलों सर्वथा । परी जणूं माता । होवोनि तूं ।।१३३७।।
मातें [3] बुझावून । दिलें स्तन-पान । रूप हें दावून । चतुर्भुज ।।१३३८।।
लाटांवरी लाटा । होतों मी तोडीत । विश्वरूपाब्धींत । बाहु-बळें ।।१३३९।।
तों चि चतुर्भुज । रूपाचिया तीरीं । लागलों श्रीहरी । तुझ्या कृपें ।।१३४०।।
सुखाचिया वृक्षीं । जणूं मेघ-वृष्टि । तैसी तुझी भेटी । द्वारकेशा ।।१३४१।।
किंवा [4] तृषार्तासी । क्षीराब्धीची प्राप्ति । तैसा तूं श्री-पति । भेटलासी ।।१३४२।।
वांचलों मी साच । ऐसा भरंवसा । आला हृषीकेशा । आतां मज ।।१३४३।।
आनंद-वेलींची । होतसे लावणी । हृदय-रंगणीं । वासुदेवा ।।१३४४।।
माझिया जीवासी । सर्व सौख्य-कंद । ऐसा तूं गोविंद । भेटलासी ।।१३४५।।

श्रीभगवानुवाच–
सुदुर्दर्शमिदं रूपं दृष्टवानसि यन्मम ।
देवा अप्यस्य रूपस्य नित्यं दर्शनकाङ्क्षिण: ।।५२।।

भक्त अर्जुनाचे । ऐकोनि हे बोल । देव श्रीगोपाळ । काय बोले ।।१३४६।।
म्हणे पार्था प्रेम । ठेवावें साचार । नित्य निरंतर । विश्व-रूपीं ।।१३४७।।
मग सुखें घ्यावें । बाह्यसुख येथें । मज श्रीहरीतें । भेटोनियां ।।१३४८।।
ऐसी तुजलागीं । दिली शिकवण । काय विस्मरण । झालें त्याचें ।।१३४९।।
प्राप्त होतां मेरू । सुवर्णसंपन्न । मानावा तो सान । मूर्खपणें ।।१३५०।।
तैसी तुझ्या मना । आंधळ्या अर्जुना । झालीसे भावना । [5] विपरीत ।।१३५१।।
तरी विश्वात्मक । विराट रूपडें । आम्ही तुजपुढें । दाविलें जें ।।१३५२।।
नव्हेच तें प्राप्त । शंभूस हि पार्था । तपें आचरितां । नानाविध ।।१३५३।।
आणि * अष्टांगादि । साधनें करून । जरी योगीजन । [6] श्रांत झाले ।।१३५४।।
तरी तयांतें हि । नाहीं ज्याची भेटी । दुर्लभ किरीटी । ऐसें जें का ।।१३५५।।

---

१ जाग्यावर. २ मानवी; माणसचें. ३ समजावून. ४ तहानलेल्या. ५ चुकीची; उलट. ६ दमले.

रूप तें [1] विराट । तरी एक वेळ । देखावें केवळ । [2] किंचिन्मात्र ॥१३५६॥
ऐशा चिंतनांत । देव हि सकळ । उत्कंठेनें काळ । घालविती ॥१३५७॥
लागली आकाशीं । चातकाची दृष्टि । व्हावी मेघ-वृष्टि । म्हणोनियां ॥१३५८॥
तैसे उत्कंठित । सदा सुर-वर । पहाया हें थोर । विश्व-रूप ॥१३५९॥
परी स्वप्नीं हि तें । देखिती ना ज्यातें । सुखें प्रत्यक्ष तें । देखिलें तूं ॥१३६०॥

नाहं वेदैर्न तपसा न दानेन न चेज्यया ।
शक्य एवंविधो द्रष्टुं दृष्टवानसि मां यथा ॥५३॥

पोहोंचे ना येथें । साधनांची धांव । वेद-शास्त्रें सर्व । [3] मुरडलीं ॥१३६१॥
विश्व-रूपाचा हा । चालावया मार्ग । तपांचा हि [4] लाग । नाहीं येथें ॥१३६२॥
यज्ञ-दानें तीं हि । झालीं असमर्थ । रूप हें यथार्थ । देखावया ॥१३६३॥
माझें विश्व-रूप । देखिलें तूं जैसें । आज अनायासें । धनंजया ॥१३६४॥
तैसें पार्था माझें । व्हावया दर्शन । एकलें साधन । भक्ति हें चि ॥१३६५॥

भक्त्या त्वनन्यया शक्य अहमेवंविधोऽर्जुन ।
ज्ञातुं द्रष्टुं च तत्त्वेन प्रवेष्टुं च परंतप ॥५४॥

परी तो चि कैसा । भक्तीचा प्रकार । सांगतों साचार । ऐक आतां ॥१३६६॥
भूतलावांचोन । जैसी अन्य गति । नेणे पार्था वृष्टि । पर्जन्याची ॥१३६७॥
किंवा गंगा जैसी । मेळवोनि जळें । मिळाली च मिळे । सागरातें ॥१३६८॥
तैसें सर्वभावें । भरोनि जें आलें । प्रेमें तुडुंबलें । एकाएकीं ॥१३६९॥
भक्ताचें तें चित्त । मद्रूप होऊन । खेळे रात्रं-दिन । मजमाजीं ॥१३७०॥
सर्वत्र सारिखा । मी तों असें कैसा । क्षीराब्धि का जैसा । क्षीराचा चि ॥१३७१॥
तैसें त्याचें चित्त । काय सांगूं फार । देखे चराचर । मद्रूप चि ॥१३७२॥
मजपासोनियां । कीटकापर्यंत । एक भगवंत । दुजें नाहीं ॥१३७३॥
तत्क्षणीं मी विश्व-। रूप भगवंत । आकळें निभ्रांत । तयालागीं ॥१३७४॥
ऐसें होतां ज्ञान । मग आपोआप । माझें विश्वरूप । दिसे तया ॥१३७५॥
[5] काष्ठामाजीं अग्नि । होतां चि निर्माण । मग काष्ठपण । हारपोनि ॥१३७६॥

---

१ विश्वव्यापी. २ थोडा वेळ; थोडेसें. ३ परत फिरलीं. ४ संबंध. ५ लांकडांत.

**काष्ठ चि तें जैसें । पार्था मूर्तिमंत । होवोनि रहात । अग्निरूप ॥१३७७॥**
**जोंवरी ना होय । सूर्याचा उदय । नभ [1] तमोमय । तोंवरी च ॥१३७८॥**
**मग एकाएकीं । प्रकाशें संपूर्ण । जातसे भरून । सूर्योदयीं ॥१३७९॥**
**पार्था तैसा होतां । माझा साक्षात्कार । संपे येरझार । अहंतेची ॥१३८०॥**
**अहंतेची [2] वारी । संपतां निर्धारीं । द्वैत जाय दूरी । एकाएकीं ॥१३८१॥**
**मग देव-भक्त । विश्वा हि सकट । स्वभावें निभ्रांत । मी चि एक ॥१३८२॥**
**ऐसा मजमाजीं । सामावोनि राहे । मी च होत आहे । एकत्वें तो ॥१३८३॥**

मत्कर्मकृन्मत्परमो मद्भक्त: सङ्गवर्जित: ।
निर्वैर: सर्वभूतेषु य: स मामेति पाण्डव ॥५५॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
श्रीकृष्णार्जुनसंवादे विश्वरूपदर्शनयोगो नाम
एकादशोऽध्याय: ॥११॥

**मग तयाचीं तीं । कर्मे होती साच । मज एकासी च । समर्पण ॥१३८४॥**
**जयालागीं जगीं । आवडे मी एक । नावडे आणिक । दुजें कांहीं ॥१३८५॥**
**इह-पर-लोक-। सार्थक सकळ । जयासी केवळ । मी च आहें ॥१३८६॥**
**मी च धनंजया । जयालागीं जाण । असें [3] प्रयोजन । जीवनाचें ॥१३८७॥**
**मग विसरला । सर्व भूतजात । मी च भगवंत । भूतीं देखे ॥१३८८॥**
**म्हणोनि स्वभावें । निर्वैर होऊन । सर्वत्र जाणून । मातें भजे ॥१३८९॥**
**ऐसा जो का भक्त । तयाचें शरीर । लोपतां साचार । मद्रूप तो ॥१३९०॥**
**विश्व हें आघवें । उदरीं सामावे । म्हणोनि स्वभावें । [4] दोंदील जो ॥१३९१॥**
**आणि कारुण्याचा । रसाळ सागर । देव तो श्रीधर । बोले ऐसें ॥१३९२॥**
**तें चि सांगितलें । तुज दैव-गुणें । संजय तो म्हणे । ऐक राया ॥१३९३॥**
**असो गोपाळाचे । बोल हे ऐकून । आनंद-संपन्न । झाला पार्थ ॥१३९४॥**
**श्रीहरि-चरण । सेवनीं साचार । एक तो चतुर । जगामाजीं ॥१३९५॥**
**तेणें देवाचिया । दोन्ही हि त्या मूर्ती । न्याहाळिल्या चित्तीं । नीटपणें ॥१३९६॥**

---

१ काळोखानें भरलेलें. २ येरझार; जाणें-येणें. ३ हेतु. ४ विशाल उदराचा.

तंव अनावर । विश्वरूपाहून । मानिलें सगुण । कृष्णरूप ।।१३९७।।
परी देवासी तें । नाहीं आवडलें । कीं तें नव्हे भलें । एकदेशी ।।१३९८।।
व्यापक तें थोर । [1] एकदेशी [2] गौण । ठसाया ही खूण । कृष्णदेवें ।।१३९९।।
दिल्या दाखवून । एक दोन युक्ती । ऐकोनि त्या चित्तीं । पार्थ म्हणे ।।१४००।।
दोन्ही रूपांमाजीं । कोणतें बरवें । तें आतां पुसावें । देवालागीं ।।१४०१।।
ऐसा [3] निजान्तरीं । करोनि विचार । पुसेल साचार । कैशा रीती ।।१४०२।।
ती च कथा आतां । संत-श्रोते जन । ऐका सावधान । होवोनियां ।।१४०३।।
ज्ञानदेव म्हणे । निवृत्ति-प्रसादें । सांगेन विनोदें । ओंवीछंदें ।।१४०४।।
रम्य ओंवीरूप । फुलें हिं मोकळीं । भरोनि ओंजळीं । सद्भावाच्या ।।१४०५।।
विश्व-रूपाचिया । [4] चरण-युगुलीं । [5] मियां समर्पिलीं । ज्ञानदेवें ।।१४०६।।

। इति श्री स्वामी स्वरूपानंदविरचित श्रीमत् अभंग-ज्ञानेश्वरी

एकादशोऽध्याय: ।

हरये नम: । हरये नम: । हरये नम: । श्रीकृष्णार्पणमस्तु ।

---

१ मर्यादित. २ कमी महत्त्वाचें. ३ स्वत:च्या मनांत. ४ पायांच्या जोडीवर. ५ मीं.